



# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १८३ * नांदेड * शनिवार, दि. ११ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचं सूप वाजलं

## ७ डिसेंबरपासून नागपुरात हिवाळी अधिवेशन



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचे शुक्रवारी सूप वाजले असून, आगामी हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबर २०२६ पासून नागपूर येथे होणार आहे. सोमवार, २२ जून ते शुक्रवार, १० जुलै २०२६ या कालावधीत पार पडलेल्या या १४ दिवसांच्या सत्रात अनेक महत्त्वाच्या लोककल्याणकारी विषयांवर सखोल चर्चा झाली. या अधिवेशनाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, ९ जुलै रोजी विधानसभेचे कामकाज सलग १८ तास १० मिनिटे चालून १० जुलैच्या पहाटे ३ वाजून ३९ मिनिटांनी स्थगित झाले. त्यामुळे संसदीय कामकाजाचा एक नवा विक्रम प्रस्थापित झाला. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधान परिषद सभापती राम शिंदे यांनी दोन्ही सभागृहांच्या प्रत्यक्ष कामकाजाची सांख्यिकीय माहिती पटलावर ठेवली.

विधानसभेत १४ दिवसांत एकूण १२७ तास ५४ मिनिटे प्रत्यक्ष कामकाज झाले. त्याची रोजची सरासरी ९ तास ८ मिनिटे इतकी होती. या सत्रात मंत्री उपस्थित नसल्यामुळे २५ मिनिटांचा, तर इतर कारणांमुळे ५ मिनिटांचा वेळ वाया गेला. विधानसभेत एकूण २२ शासकीय विधेयके पुरःस्थापित करण्यात आली, त्यापैकी २१ विधेयके संमत करण्यात आली, तर १ विधेयक संयुक्त समितीकडे पाठवण्यात आले. अशासकीय १२ विधेयके चर्चेअंती मागे घेण्यात आली. तारांकित प्रश्नांच्या ९ हजार ९५ सूचनांपैकी ४१० प्रश्न स्वीकृत झाले आणि ५८ प्रश्नांना प्रत्यक्ष उत्तरे मिळाली. लक्षवेधीच्या २ हजार ९९८ सूचनांपैकी २९२ स्वीकृत होऊन ६२ सूचनांवर सभागृहात चर्चा झाली. नियम २९३ अन्वये प्राप्त सर्व ५ प्रस्तावांवर चर्चा पार पडली. विधानसभेत आमदारांची जास्तीत जास्त उपस्थिती ८४.९६ टक्के, तर सरासरी उपस्थिती ७५.२६ टक्के इतकी नोंदवली गेली.

दुसरीकडे, विधान परिषदेतही १४ दिवसांमध्ये १०१ तास १० मिनिटे प्रत्यक्ष कामकाज झाले आणि रोजची सरासरी ७ तास १३ मिनिटे राहिली. मंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे ३५ मिनिटे, तर इतर कारणांमुळे ४० मिनिटे वाया गेली. विधान परिषदेत पुरःस्थापित करण्यात आलेली सर्व ९ शासकीय विधेयके संमत करण्यात आली. तसेच विधानसभेतून मंजूर होऊन आलेली १८ विधेयकेही येथे पारित करण्यात आली आणि १ विधेयक संयुक्त समितीकडे पाठवण्यात आले. या सभागृहात प्राप्त २ हजार २९ तारांकित प्रश्नांपैकी ५४१ स्वीकृत झाले आणि ५८ प्रश्न उत्तरित झाले. ९३० लक्षवेधी सूचनांपैकी २४५ मान्य होऊन ४८ वर विस्तृत चर्चा झाली. नियम २६० अन्वये आलेल्या ५ प्रस्तावांवर सखोल चर्चा करण्यात आली. विधान परिषदेत सदस्यांची कमाल उपस्थिती ९०.१४ टक्के, तर एकूण सरासरी उपस्थिती ७८.५७ टक्के इतकी लक्षणीय होती.

# राज्यातील शेतकऱ्यांचे २ लाखांपर्यंतचं कर्ज माफ होणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील महात्मा फुले कर्जमाफी योजनेचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचा लाभ मिळणार होता तो आता २ लाख रुपयांपर्यंत मिळेल आणि प्रोत्साहनपर अनुदानासाठीची २०२६-२७ चं पीक कर्ज भरण्याची अट रद्द करतो, अशी घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी केली. कर्जमाफीच्या निर्णयासाठी २०२९ पर्यंत थांबू शकलो असतो मात्र आम्ही तसं केल नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

कर्जमाफीच्या संदर्भात इथं बरीच चर्चा झाली. कर्जमाफी हा परिस्थितीची आवश्यकता म्हणून करत आहोत. कुठल्याही कर्जमाफीनं शेतकरी श्रीमंत झाला नाही तो होऊ शकत नाही. शेतकऱ्याकडे सावकाराकडे जावं लागू नये हा एक उद्देश कर्जमाफीचा असतो. आम्ही विधानसभा निवडणुकीच्या वेळी कर्जमाफी करण्याचा शब्द दिला होता, आम्ही २०२९ पर्यंत थांबू शकलो असतो, आम्ही सर्व निवडणुका जिंकलो आहोत, मात्र आम्ही तसं केले नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

शेतकरी अडचणीत असेल तर त्याला कर्जमाफी दिली पाहिजे हे ठरवलं आणि आपल्या सरकारनं कर्जमाफीचा निर्णय केला. कर्जमाफी, एकवेळ समझोता आणि प्रोत्साहनपर अनुदानाचा निर्णय घेतला. महायुती सरकार दरवर्षी २५ हजार कोटी रुपयांची वीज माफी सरकार करतेय. दरवर्षी हे पैसे दिले जातात, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

२००८ मध्ये देशात कर्जमाफी झाली, त्यानंतर २००९ मध्ये कर्जमाफी करण्यात आली. त्यावेळी २००८ मध्ये ज्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला त्यांना २००९ मध्ये वगळलं होतं. २०२६-२७ च्या कर्जाची परतफेड केली पाहिजे, अशी अट टाकली होती, ज्यांना प्रोत्साहनपर लाभ देतोय, त्यांनी कर्ज वेळेत भरलं पाहिजे अशी भूमिका त्यामागील होती, असं देवेंद्र फडणीस म्हणाले. सातत्यानं या संदर्भात अटी शर्थी आहेत, अशी मागणी होत होती. रणधीर सावरकरांच्या नेतृत्त्वात महायुतीचे आमदार भेटले आणि ५० हजारांची अट काढून टाका, अशी मागणी केली. मी त्यांना अट काढून टाकल्यानं ४-५ हजार कोटींचा बोजा येईल. पण शिस्तीचा भाग म्हणून ही अट आणली आहे, समजा एक लाखांपर्यंत नेली तर २ लाख शेतकरी फायदा न मिळणारे राहतात. सगळ्याचं मत होतं, २ लाख शेतकरी का सोडता. मी आर्थिक शिस्त सांगत होते, ते लोक मला व्यापक विचार केला पाहिजे होते, असं सांगत होते.

# नांदेड येथील विष्णुपुरी उड्डाणपुलाच्या घटनेची उच्चस्तरीय चौकशी होणार

## दोषींवर कडक कारवाई केली जाईल -पालकमंत्री अतुल सावे



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड-लातूर राष्ट्रीय महामार्गावरील विष्णुपुरी येथे श्री गुरुगोविंदसिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालयासमोरील उड्डाणपुलाच्या बाजूचा खालचा भाग अचानक कोसळल्याच्या घटनेची शासनाने गंभीर दखल घेतली असून, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. चौकशीत बांधकामातील त्रुटी, निकृष्ट दर्जाचे साहित्य, कामातील निष्काळजीपणा अथवा संबंधित यंत्रणेकडून कोणत्याही प्रकारची हयगय झाल्याचे आढळल्यास जबाबदारांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे निर्देश पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले.

घटनेनंतर पालकमंत्री अतुल सावे यांनी तातडीने जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधून परिस्थितीचा सविस्तर आढावा घेतला. संबंधित अधिकाऱ्यांकडून घटनेची माहिती घेऊन नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. उड्डाणपुलाची संरचनात्मक स्थिरता तपासून आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित विभागाला दिले. या घटनेच्या तांत्रिक चौकशीसाठी केंद्रीय पातळीवरील तज्ज्ञांची टीम दिल्लीहून नांदेड येथे दाखल होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी तातडीने संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून माहिती घेत त्यांनी उड्डाणपुलावरील वाहतूक तात्पुरती बंद करण्याचे निर्देश दिले. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना तात्काळ राबविण्यात आल्या. रस्त्यावर पडलेला मलबा जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आला तसेच पर्यायी मार्गाने वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही केली.

या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा मोठी दुखापत झाली नसल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र, भविष्यात अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी उड्डाणपुलाच्या संपूर्ण बांधकामाची तांत्रिक तपासणी करण्यात येणार असून त्याचा सविस्तर अहवाल शासनाकडे सादर करण्यात येणार आहे.

पालकमंत्री अतुल सावे यांनी सांगितले की, सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या कामांमध्ये दर्जाबाबत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. नागरिकांच्या जीविताशी संबंधित कामांमध्ये निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी, कंत्राटदार अथवा संबंधित यंत्रणांविरुद्ध चौकशी अहवालानुसार नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल.

## राजपाल यादवला ९ कोटींच्या चेक बाऊन्स प्रकरणात ३ महिन्यांचा तुरुंगवास

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** दिल्ली उच्च न्यायालयाने ९ कोटी रुपयांच्या कर्ज प्रकरणाशी संबंधित ७ वेगवेगळ्या खटल्यांमध्ये विनोदी अभिनेता राजपाल यादवला प्रत्येकी तीन महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे.

न्यायमूर्ती स्वर्णकांता शर्मा यांनी हा निकाल देताना राजपालला तक्रारदार कंपनीला प्रत्येक खटल्यात १.०५ कोटी रुपये देण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाने राजपालला तक्रारदाराला १ कोटी ४ लाख ७५ हजार रुपये आणि सरकारी तिजोरीत २५ हजार रुपये जमा करण्यास सांगितले आहे. तर राजपालची पत्नी राधा यादव हिने देखील प्रत्येक प्रकरणात तक्रारदाराला ५ लाख ५१ हजार ३८० रुपये द्यावेत, असे आदेश कोर्टाने दिले आहेत.

# हिमायतनगर शहरातील नामांकित कोचिंग क्लासेस संचालकाची आत्महत्या; मृत्यूचे कारण अद्याप अस्पष्ट

**हिमायतनगर (प्रतिनिधी)–** शहरातील शिक्षण क्षेत्रात प्रदीर्घ काळ कार्यरत असलेले नामांकित खाजगी कोचिंग क्लासेसचे संचालक एन. टी. जाधव यांनी ट्युशनच्या परिसरातील चिंचेच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना दि. १० जुलै रोजीच्या पहाटे घडली.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सकाळी काही नागरिकांना ही दुर्दैवी घटना निदर्शनास आली. याची माहिती तत्काळ हिमायतनगर पोलीस ठाण्याला देण्यात आली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत प्राथमिक सोपस्कार पूर्ण केले आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविला. घटनेची माहिती मिळताच मोठ्या संख्येने नागरिक, माजी विद्यार्थी, पालक आणि परिसरातील प्रतिष्ठित व्यक्तींनी परिसरात गर्दी केली होती.

एन. टी. जाधव हे अनेक वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात सक्रिय होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षा तसेच शैक्षणिक क्षेत्रात मोठे यश मिळविले होते. शांत, संयमी आणि विद्यार्थ्यांप्रती आपुलकीची भावना जपणारे आदर्श शिक्षक अशी त्यांची ओळख होती. त्यामुळे त्यांच्या अशा अचानक जाण्याने सर्वत्र दुःख व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, त्यांच्या या टोकाच्या पावलामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. परिसरात काही व्यावसायिक बाबी किंवा मानसिक तणावासंदर्भातील उलट-सुलट चर्चा सुरू असल्या, तरी या सर्व बाबींना अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी मिळालेली नाही.

पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या घटनेचे खरे कारण शोधण्यासाठी पोलिसांनी सर्व शक्य त्या अंगांनी तपास सुरू केला आहे. मयताच्या कुटुंबियांचे जबाब, जवळील व्यक्तींची चौकशी, आणि इतर संबंधित बाबींची पडताळणी केली जात आहे. शवविच्छेदन अहवाल आणि तपासातील निष्कर्षानंतरच सत्य समोर येईल असे सांगण्यात येत आहे.

हिमायतनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत तपास पूर्ण होईपर्यंत संयम बाळगावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. या घटनेने हिमायतनगर शहरातील शिक्षण क्षेत्राचे मोठे नुकसान झाले असून, विद्यार्थ्यांसह सर्व स्तरांतून एन. टी. जाधव यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

# राज्यभरात एकाच वेळी १५० हून अधिक ठिकाणी छापे

## पाकिस्तानातील गँगस्टर शहजाद भट्टीशी कथित संपर्क प्रकरणी महाराष्ट्र एटीएस कारवाई

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पाकिस्तानातील गँगस्टर शहजाद भट्टी याच्याशी सोशल मीडियाच्या माध्यमातून कथित संपर्कात असलेल्या व्यक्तींविरोधात महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने मोठी कारवाई सुरू केली आहे. या कारवाईअंतर्गत राज्यभरातील १५० हून अधिक ठिकाणी एकाच वेळी शोधमोहीम सुरू केलं आहे. यामध्ये मुंबई, ठाणे, कुर्ला, वांद्रे, जोगेश्वरी, नवी मुंबई, मीरा रोड, भाईंदर, सांगली, सातारा, छत्रपती संभाजीनगर तसेच अन्य अनेक ठिकाणी एटीएसचे छापे सुरू आहेत.

प्राथमिक माहितीनुसार, पाकिस्तानातील गँगस्टर शहजाद भट्टी याच्याशी सोशल मीडियाद्वारे कथित संपर्क असल्याच्या संशयावरून १५० हून अधिक व्यक्ती ढढच्या रडारवर असून, त्याच अनुषंगाने ही व्यापक शोधमोहीम राबविण्यात येत आहे. दरम्यान या शोधमोहीमसंदर्भात अद्याप कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नसली तरी या सर्च ऑपरेशनचा चर्चेनं एकच खळबळ उडाली आहे.

# श्रीराम मंदिर चंदा चोरी प्रकरण; काँग्रेसचे 'रघुपती राघव राजाराम' सत्याग्रह

**नांदेड (प्रतिनिधी)–** अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिराच्या करोडो रुपयांच्या चंदा चोरी विरोधात, खा. रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात व उत्तर जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या पुढाकाराने नांदेड शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने महावीर चौक येथील हनुमान मंदिर परिसरात शुक्रवार, दि. १० जुलै रोजी रघुपती राघव राजाराम सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. यावेळी टाळ मृदुंगच्या गजरात अभंगातून प्रभू श्रीरामाचा जयघोष करण्यात आला.




प्रभू श्रीरामाच्या नावाने राजकारण करत करत थेट अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या करोडो रुपयांचा चंदाचोरी पर्यंत या सरकारचा भ्रष्टाचार पोहोचला आहे. त्यामुळे या सरकारचा हिंदू नामक ढोंगी चेहरा जनतेपुढे आला आहे, अशी टीका खासदार तथा दक्षिण जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी यावेळी केली. उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे व महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांनी श्री राममंदिर चोरी विरोधात जोरदार निषेध व्यक्त केला.

यावेळी माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, प्रदेश सरचिटणीस डॉ. रेखाताई चव्हाण, सुरेंद्र घोडसकर, एकनाथराव मोरे, आनंद चव्हाण, तिरुपती पाटील कोंढेकर, बालाजी गाडे, श्रीनिवास मोरे, महेश देशमुख तरोडेकर, सत्यपाल सावंत, मधूकर दिघे, अजिज कुरेशी, बाबुभाई खोकेवाले, फारुख भाई, शेर अली, आनंदराव कल्याणकर, बापूसाहेब पाटील, दीपकसिंग हुजुरीया, जसपालसिंग तबेलेवाले, बाळासाहेब आंबेगावकर, मधूकर सोनटक्के, संजय वाघमारे, गगन यादव, नागराज सुलगेकर, अतुल पेदेवाड, शंकर शिंदे, आंबादास रातोळे, गणेश कोकाटे, अक्षय नळगे, गोविंद पाटील, जेशिका शिंदे, ज्योती कदम, सुरेखा वैद्य, विमलताई कीर्तने, मुरलीधर कल्याणकर, एस.पी. कुभारे, गौतम सिरसाट, प्रबुद्ध चिते, प्रकाश दिपके, प्रसेनजित वाघमारे, सचिन टाले, गंगाधर आडेराव, संजय कौठेकर, गंगाधर डांगे, प्रितम जोंधळे, कलिम शेख, धनंजय उमरीकर, आदीसह इतर काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच पावडेवाडी येथील भजनी मंडळ हभप गोपीनाथ महाराज पावडेवाडीकर, हभप मोरे महाराज सोनखेडकर, रंजन पावडे, सोपान शिंदे, गंगाधर शिंदे, पांडुरंगराव पावडे, अशोक पावडे, ध्यानेश्वर पावडे आदीजण उपस्थित होते.

## २० राज्यात अतिमुसळधार पावसाचा इशारा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारतीय हवामान विभागाकडून राज्यातील तब्बल २० राज्यांना दि. ११ जुलैपासून अतिमुसळधार पावसाचा हाय अलर्ट देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान याच काळात प्रति तास ८० किमी वेगाने जोरदार वारे देखील वाहन्याची शक्यता आहे. उत्तर भारतामध्ये पुढील २४ तासांमध्ये पावसाचा जोर अधिक वाढणार आहे, तर पूर्व भारतामध्ये देखील वादळी वाऱ्यासह अति मुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. मच्छिमारांनी समुद्रात जाऊ नये, असं आवाहनही या सर्व पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाकडून करण्यात आलं आहे.



# एसजीजीएस अभियांत्रिकी व्यवस्थापकीय मंडळावर आयपीएस संजय लाटकर यांची नियुक्ती

## राज्य सरकारने नव्याने केली बारा सदस्यांची निवड

**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** महाराष्ट्र शासनाने येथील विष्णुपुरी परिसरात असलेल्या श्री गुरु गोविंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्थेच्या व्यवस्थापकीय मंडळावर नव्याने १२ सदस्यांची नियुक्ती केली आहे. यात पोलीस महासंचालक संजय लाटकर यांचा समावेश आहे. त्यांची ही निवड तीन वर्षांसाठी विद्यापीठ नियामक मंडळाच्या शिफारसीनुसार करण्यात आली आहे.



विष्णुपुरी येथील श्री गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्थेमध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या १७ जानेवारी २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये नियामक मंडळाची स्थापना करण्यात आलेली होती. सदर शासन निर्णयात नमूद नियामक मंडळाची मुदत तीन वर्ष कालावधीकरिता व विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे नामनिर्देशित व्यक्तींची मुदत पाच वर्षे इतकी आहे. त्यानुसार सदर संस्थेच्या नियामक मंडळातील शासन नियुक्त सदस्यांचा कार्यकाळ दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी समाप्त झाला होता. त्यानुसार श्री गुरुगोविंद सिंग जी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्थेत या अशासकीय अनुदानित स्वायत्त संस्थेच्या नियामक मंडळाचे नव्याने गठन शासनाने केले. यात १२ सदस्यांची निवड करण्यात आली आहे.

शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या नियामक मंडळाच्या बैठकांसाठी तथा संस्थेच्या निगडित अन्य कामकाजासाठी व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष व सदस्य यांना महाराष्ट्र राज्याच्या सचिव स्तरावरील अधिकाऱ्यास देय असणाऱ्या प्रवासाच्या सवलती, प्रवास भत्ता व बैठक भत्ता देण्यात येणार आहे. नांदेडचे भूमिपुत्र तथा पोलीस महासंचालक (डीजीपी) संजय लाटकर आणि सुरेश जोंधळे यांची वर्णी लागल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# नांदेड जिल्ह्यातील शाळा ३० जुलैपर्यंत सकाळीच!

## बीएलओंच्या व्यस्ततेमुळे वेळेत बदल, मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षणासाठी शिक्षकांवर जबाबदारी

**नांदेड (प्रतिनिधी)–** मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण - एसआयआर २०२६ कार्यक्रमामुळे नांदेड जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांची वेळ ३० जुलैपर्यंत सकाळी ७ ते दुपारी १२ अशी करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी १० जुलै रोजी दिलेल्या पत्रानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. एसआयआर कार्यक्रमांतर्गत प्रत्येक पात्र मतदाराची नोंदणी व्हावी आणि अपात्र मतदारांचा समावेश होऊ नये, यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी - बीएलओ यांच्यामार्फत Enumeration Form चे घरपोच वितरण, संकलन आणि डिजिटायझेशन ही कामे विहित कालमर्यादेत पूर्ण करायची आहेत.

नांदेड जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी बीएलओ म्हणून शिक्षकांची नियुक्ती झाली आहे. त्यामुळे त्यांच्या नियमित शैक्षणिक जबाबदाऱ्या आणि एसआयआरच्या कामात समन्वय साधण्यासाठी शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्देश दिले आहेत.

यासह बीएलओ म्हणून नियुक्त शिक्षकांच्या शिकवणीच्या तासिका शक्यतो कमी ठेवाव्यात, प्राधान्याच्या तासिका सलग ठेवाव्यात, ३० जुलैपर्यंत सर्व शाळा केवळ सकाळच्या सत्रात भरवाव्यात, असे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ३० जुलैपर्यंत नांदेड जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या शाळांचे वेळापत्रक सकाळी ७ ते दुपारी १२ वाजेपर्यंत राहणार आहे.

सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी याची नोंद घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# समाजमाध्यमं शोषण केंद्र होतायेत?

आज लहान मुले अत्यंत कमी वयात स्मार्टफोन आणि सोशल मीडियाचा वापर करू लागली आहेत. डिजिटल साक्षरता, ऑनलाईन सुरक्षेचे शिक्षण आणि पालकांची जागरूकता यांशिवाय या संकटावर मात करणे अशक्य आहे. केवळ तंत्रज्ञानावर दोष टाकून चालणार नाही; त्याच्या सुरक्षित वापराची संस्कृतीही निर्माण करावी लागेल. इंटरनेट हे स्वतःमध्ये चांगले किंवा वाईट नसते. ते एक साधन आहे. त्याचा उपयोग ज्ञान, संवाद आणि विकासासाठी होऊ शकतो, तसेच गुन्हेगारी, शोषण आणि फसवणुकीसाठीही होऊ शकतो. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबत उत्तरदायित्वाची चौकटही तितकीच मजबूत असणे आवश्यक आहे. इंटरनेट आणि सोशल मीडियाने जगाला एका क्लिकवर आणून ठेवले आहे. शिक्षण, व्यवसाय, संवाद, आरोग्य, प्रशासन आणि माहितीची देवाणघेवाण यामध्ये डिजिटल तंत्रज्ञानाने क्रांती घडवून आणली. मात्र, या तंत्रज्ञानाचा जितका विधायक वापर झाला, तितक्याच वेगाने त्याचा गैरवापरही वाढला. सायबर फसवणूक, 'डिजिटल अटक', आर्थिक घोटाळे, ऑनलाईन छळ, अश्लील साहित्याचा प्रसार आणि आता बाल लैंगिक शोषणाशी संबंधित सामग्रीचे खुलेआम प्रचार-प्रसार या घटना अत्यंत चिंताजनक आहेत. या पार्श्वभूमीवर सोशल मीडिया कंपन्यांची जबाबदारी आणि शासनाची भूमिका यांचा गंभीरपणे पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. अलीकडेच इंस्टाग्रामवर बाल लैंगिक शोषणाशी संबंधित सशुल्क जाहिराती दिसल्याचा आरोप अत्यंत धक्कादायक आहे. एवढेच नव्हे, तर नाममात्र शुल्क भरून अशा गुन्हेगारी स्वरूपाच्या व्हीडीओंच्या लिंक उपलब्ध करून दिल्या जात असल्याच्या आरोपांनी संपूर्ण डिजिटल विश्वालाच हादरा दिला आहे. जगभरातील कोट्यवधी वापरकर्ते असलेल्या व्यासपीठावर अशा प्रकारची सामग्री जाहिरातींच्या स्वरूपात पोहोचते, याचा अर्थ केवळ एखाद्या व्यक्तीचा गुन्हा नसून संपूर्ण डिजिटल देखरेख व्यवस्थेतील गंभीर त्रुटी आहे. सोशल मीडिया कंपन्या अनेकदा कृत्रिम बुद्धिमत्ता, अत्याधुनिक अल्गोरिदम आणि स्वयंचलित तपासणी यंत्रणा असल्याचा दावा करतात. मग द्वेषयुक्त मजकूर, कॉपीराइट उल्लंघन किंवा राजकीय पोस्ट काही मिनिटांत शोधणारी ही यंत्रणा बाल लैंगिक शोषणासारखी घृणास्पद सामग्री ओळखण्यात अपयशी कशी ठरते? हा केवळ तांत्रिक दोष आहे की व्यावसायिक फायद्यासाठी केलेली दुर्लक्षाची भूमिका, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. आज सोशल मीडिया कंपन्यांचा महसूल प्रामुख्याने जाहिरातींवर अवलंबून आहे. अधिक वापरकर्ते, अधिक वेळ आणि अधिक सहभाग म्हणजे अधिक उत्पन्न. अशा परिस्थितीत वादग्रस्त, धक्कादायक किंवा उत्तेजक सामग्रीला अप्रत्यक्षरीत्या चालना मिळत असल्याची टीका नवीन नाही. ताजे उदाहरण केतन अग्रवाल यांच्या खुनासंदर्भात देता येईल. आरोपीने वेगवेगळे युट्युब वरील व्हीडीओ बघून खुनाची योजना आखली होती असे पोलिसाने सांगितले आहे. त्यामुळे आता जास्त सजग राहणे गरजेचे झाले आहे. इंस्टाग्राम सारख्या कंपन्यांनी केवळ आम्ही एक प्लॅटफॉर्म आहोत या भूमिकेच्या मागे लपून चालणार नाही. त्यांच्या माध्यमातून जर गुन्हेगारी सामग्रीचा प्रसार होत असेल, तर त्याची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारीही त्यांनी स्वीकारली पाहिजे. केंद्र सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेत मेटाला चौकशीसाठी बोलावले आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. यापूर्वीही व्हॉट्सॲपच्या काही नव्या वैशिष्ट्यांबाबत सरकारने आक्षेप घेतला होता. मात्र, केवळ नोटिसा बजावून किंवा चौकशी करून हा प्रश्न सुटणार नाही. माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी, कठोर दंडात्मक कारवाई आणि भारतात कार्यरत डिजिटल कंपन्यांवर स्पष्ट उत्तरदायित्व निश्चित करणे ही काळाची गरज आहे. डिजिटल युगात अभिव्यक्ती स्वातंत्र्य महत्त्वाचे आहे; परंतु त्याच्या नावाखाली बालकांचे शोषण, अश्लीलता, सायबर गुन्हे आणि समाजविघातक कृत्यांना संरक्षण मिळता कामा नये. सोशल मीडिया कंपन्यांनी नफा कमावण्यापेक्षा सामाजिक उत्तरदायित्वाला प्राधान्य दिले पाहिजे आणि सरकारनेही कठोर नियमन व प्रभावी देखरेखीद्वारे डिजिटल विश्व अधिक सुरक्षित करण्यासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत. अन्यथा, मानवजातीच्या प्रगतीसाठी निर्माण झालेले तंत्रज्ञानच समाजाच्या नैतिक आणि सामाजिक अधःपतनाचे सर्वात मोठे साधन ठरेल. हे रोखण्यासाठी पालक, शिक्षक आणि समाजाची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे.

# वाढती लोकसंख्या: वरदान की विकासाला आव्हान?



दरवर्षी ११ जुलै हा दिवस जगभरात जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो.वाढती लोकसंख्या ही देशाची ताकद आहे की विकासाच्या मार्गातील अडथळा? हा प्रश्न आज संपूर्ण जगासमोर उभा आहे. आज भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशांपैकी एक असून, हीच लोकसंख्या आपल्या देशाची सर्वात मोठी संपत्तीही ठरू शकते आणि योग्य नियोजनाचा अभाव असल्यास सर्वात मोठे आव्हानही ठरू शकते. वाढती लोकसंख्या म्हणजे केवळ वाढणारी संख्या नव्हे, तर त्यासोबत रोजगार, शिक्षण, आरोग्य, अन्न, पाणी, निवारा आणि पर्यावरण यांवर वाढणारा ताणही होय. म्हणूनच आजच्या काळात प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहेवाढती लोकसंख्या ही वरदान आहे की विकासाला आव्हान? या प्रश्नाचे उत्तर शोधणे हीच आजच्या जागतिक लोकसंख्या दिनाची खरी गरज आहे.

लोकसंख्या ही कोणत्याही देशाची अमूल्य संपत्ती असते. योग्य शिक्षण, कौशल्य, आरोग्य आणि नियोजन यांची जोड मिळाल्यास वाढती लोकसंख्या देशाच्या सर्वांगीण विकासासाठी एक मोठी ताकद ठरू शकते. लोकसंख्या ही केवळ वाढणारी संख्या नसून, ती देशाच्या प्रगतीला चालना देणारे मानवी भांडवल आहे.

भारत हा जगातील सर्वाधिक तरुण लोकसंख्या असलेल्या देशांपैकी एक आहे. ही युवा शक्ती देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि तांत्रिक विकासाची प्रमुख आधारशिला ठरू शकते. उद्योग, शेती, सेवा, माहिती-तंत्रज्ञान, संशोधन, आरोग्य, शिक्षण अशा विविध क्षेत्रांसाठी मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळ उपलब्ध होणे ही भारताची मोठी जमेची बाजू आहे. प्रशिक्षित आणि कार्यक्षम कामगार देशाच्या उत्पादनक्षमतेत वाढ करून अर्थव्यवस्थेला बळकटी देतात.

मोठी लोकसंख्या म्हणजे मोठी ग्राहक बाजारपेठ. त्यामुळे उद्योगधंद्यांना विस्ताराची संधी मिळते, नवीन गुंतवणूक आकर्षित होते आणि रोजगाराच्या संधी वाढतात. देशांतर्गत मागणी वाढल्यामुळे उत्पादन, व्यापार आणि सेवा क्षेत्राला चालना मिळते. याचा थेट परिणाम देशाच्या आर्थिक विकासावर होतो. याशिवाय, शिक्षित आणि कौशल्यसंपन्न युवक नवकल्पना, संशोधन आणि उद्योजकतेच्या माध्यमातून देशाला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळवून देऊ शकतात. आज भारतीय तरुण कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती-तंत्रज्ञान, अवकाश संशोधन, वैद्यकीय विज्ञान, स्टार्टअप्स आणि नवउद्योग अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. योग्य संधी आणि मार्गदर्शन मिळाल्यास हीच युवा शक्ती भारताला विकसित राष्ट्र बनविण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकते. मात्र, हे सर्व तेव्हाच शक्य आहे जेव्हा लोकसंख्येला दर्जेदार शिक्षण, आरोग्यसेवा, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध करून दिल्या जातील. शिक्षित, निरोगी आणि कौशल्यसंपन्न लोकसंख्या हीच देशाच्या विकासाची खरी शक्ती आहे. त्यामुळे योग्य नियोजनासह वाढती लोकसंख्या ही देशासाठी ओझे नसून एक अमूल्य वरदान ठरू शकते.

लोकसंख्या ही देशाची शक्ती असली, तरी तिची वाढ उपलब्ध संसाधने आणि विकासाच्या गतीपेक्षा अधिक वेगाने झाली तर ती देशाच्या प्रगतीसमोर मोठे आव्हान निर्माण करते. अनियंत्रित लोकसंख्या वाढीमुळे आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय समस्यांमध्ये वाढ होते. त्यामुळे विकासाची फळे प्रत्येक नागरिकापर्यंत समानपणे पोहोचवणे कठीण बनते.

सर्वप्रथम, रोजगाराच्या संधीपेक्षा बेरोजगारी वेगाने वाढते. दरवर्षी लाखो युवक रोजगाराच्या शोधात असतात; परंतु त्यानुसार नवीन रोजगारनिर्मिती होत नाही. परिणामी बेरोजगारी, अल्परोजगारी आणि आर्थिक अस्थिरता वाढते. तसेच, अन्न, पाणी, वीज, निवारा आणि इतर मूलभूत गरजांवर प्रचंड ताण येतो. लोकसंख्या वाढत असताना नैसर्गिक संसाधने मर्यादित असल्यामुळे अनेक भागांत पाण्याची टंचाई, घरांची कमतरता आणि ऊर्जा संकट निर्माण होते. शिक्षण आणि आरोग्य व्यवस्था देखील अपुऱ्या पडतात. शाळा, महाविद्यालये, रुग्णालये आणि आरोग्य केंद्रांवर वाढत्या लोकसंख्येचा ताण येतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाला दर्जेदार शिक्षण आणि आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे कठीण होते. याशिवाय, शहरीकरणाचा वेग वाढल्याने शहरांमध्ये गर्दी, वाहतूक कोंडी, प्रदूषण आणि झोपडपट्ट्यांचे प्रमाण वाढते. अपुऱ्या नागरी सुविधांमुळे नागरिकांच्या जीवनमानावर विपरीत परिणाम होतो. वाढत्या लोकसंख्येमुळे नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर होतो. जंगलतोड, पाण्याचा अतिरेक वापर, प्रदूषण आणि जैवविविधतेचा ऱ्हास यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडते. हवामान बदलाचे परिणामही अधिक तीव्र होतात.

याचबरोबर गरिबी, कुपोषण आणि सामाजिक विषमता वाढण्याचा धोका निर्माण होतो. संसाधनांचे असमान वाटप झाल्यामुळे समाजातील आर्थिक दरी वाढते आणि सर्वसमावेशक विकासाचे उद्दिष्ट साध्य करणे कठीण होते. म्हणूनच, लोकसंख्या ही समस्या नसून तिचे योग्य नियोजन न होणे ही खरी समस्या आहे. लोकसंख्या वाढीबरोबर शिक्षण, आरोग्य, रोजगार, पर्यावरण संवर्धन आणि संसाधनांचे सुयोग्य नियोजन यांवर भर दिला तरच विकासाचा लाभ प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचू शकतो. अन्यथा वाढती लोकसंख्या देशाच्या प्रगतीसमोर मोठे आव्हान ठरते.

लोकसंख्या वाढ आणि पर्यावरण यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. जशी लोकसंख्या वाढते, तशी अन्न, पाणी, निवारा, ऊर्जा आणि इतर नैसर्गिक संसाधनांची मागणीही वाढते. ही वाढ जर शाश्वत पद्धतीने व्यवस्थापित केली गेली नाही, तर पर्यावरणाचे संतुलन बिघडते आणि त्याचे दुष्परिणाम संपूर्ण मानव जातीला भोगावे लागतात.

सर्वप्रथम, वाढत्या लोकसंख्येमुळे जंगलतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास होतो. नवीन वसाहती, उद्योग, रस्ते आणि शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर जंगलांची तोड केली जाते. त्यामुळे अनेक वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत आणि पर्यावरणाचे नैसर्गिक संतुलन ढासळत आहे.

पाण्याची कमतरता आणि भूजल-पातळी घटणे हीदेखील गंभीर समस्या बनली आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे पिण्याचे पाणी, शेती आणि उद्योगांसाठी पाण्याची मागणी सतत वाढत आहे. भूजलाचा अति उपसा केल्यामुळे अनेक भागांत विहिरी आणि बोअरवेल कोरड्या पडत आहेत, तर भविष्यात पाण्याचे संकट अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. याशिवाय, हवामान बदलाचे परिणामही अधिक तीव्र होत आहेत. वाढते प्रदूषण आणि हरितगृह वायूंचे उत्सर्जन यामुळे जागतिक तापमान वाढत आहे. परिणामी अनियमित पाऊस, उष्णतेच्या लाटा, पूर, दुष्काळ आणि इतर नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढत आहे. याचा परिणाम शेती, अर्थव्यवस्था आणि जनजीवनावर होत आहे. म्हणूनच, पर्यावरणाचे संरक्षण आणि लोकसंख्येचे सुयोग्य नियोजन ही काळाची गरज आहे. नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर, वृक्षारोपण, पाणी संवर्धन, प्रदूषण नियंत्रण आणि शाश्वत विकासाचा स्वीकार केल्यासच आपण पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि समृद्ध पर्यावरण निर्माण करू शकतो. पर्यावरण वाचवायचे असेल, तर लोकसंख्या वाढीसोबत संसाधनांचेही सुयोग्य नियोजन करावे लागेल.

लोकसंख्या वाढीबरोबर सामाजिक विकासालाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. महिलांचे शिक्षण आणि सक्षमीकरण हे सुजाण आणि प्रगत समाजाचे आधारस्तंभ आहेत. कुटुंब नियोजनाबाबत जनजागृती झाल्यास कुटुंबाचे आरोग्य, शिक्षण आणि आर्थिक स्थिती सुधारते. मुलगा-मुलगी समानतेचा स्वीकार केल्याने समाजात समान संधी आणि न्यायाची भावना निर्माण होते. तसेच, संतुलित लिंग गुणोत्तर हे निरोगी, सुसंस्कृत आणि समतोल समाजाचे महत्त्वाचे लक्षण आहे. म्हणूनच लोकसंख्या वाढीबरोबर सामाजिक मूल्ये, समानता आणि शिक्षण यांनाही प्राधान्य देणे आवश्यक आहे.

वाढत्या लोकसंख्येला विकासाची ताकद बनवण्यासाठी प्रभावी उपाययोजना आवश्यक आहेत. सर्वांसाठी दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून मानवी संसाधन सक्षम केले पाहिजे. महिलांचे उच्च शिक्षण आणि आर्थिक सक्षमीकरण यांना प्राधान्य दिल्यास कुटुंब आणि समाजाचा सर्वांगीण विकास होतो. कुटुंब नियोजनाच्या सुविधा आणि जनजागृती प्रत्येकापर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. युवकांसाठी कौशल्य विकास आणि रोजगारनिर्मिती यावर भर दिल्यास बेरोजगारी कमी होईल. तसेच, नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने व शाश्वत वापर करून पर्यावरणाचे संरक्षण करणे आवश्यक आहे. लोकसंख्या वाढ आणि शाश्वत विकास यांचा समतोल साधणे हीच समृद्ध आणि विकसित भारताची गुरुकिल्ली आहे.

लोकसंख्या ही स्वतःमध्ये समस्या नसून, अनियोजित आणि असंतुलित लोकसंख्या वाढ ही खरी समस्या आहे. योग्य शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यास लोकसंख्या ही देशाची मोठी ताकद बनू शकते. शिक्षित, निरोगी, कुशल आणि जबाबदार नागरिक हेच राष्ट्राच्या प्रगतीचे खरे सामर्थ्य आहेत. त्यामुळे लोकसंख्येचे योग्य नियोजन आणि शाश्वत विकासाचा स्वीकार केला तर ती देशासाठी वरदान ठरते; अन्यथा ती विकासाच्या मार्गातील मोठे आव्हान बनू शकते.

देशाची खरी ताकद केवळ लोकसंख्येच्या संख्येत नसते; ती त्या लोकसंख्येच्या शिक्षणात, आरोग्यात, कौशल्यात आणि जबाबदारीत असते. संतुलित लोकसंख्या म्हणजेच समृद्ध भारताचा भक्कम पाया.

**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड.
मो. ९७६७८३०४९८

# आपण विश्वात एकटेच आहोत का? एलियनच्या शोधामागील विज्ञान

रात्रीच्या शांत आकाशात लुकलुकणाऱ्या असंख्य ताऱ्यांकडे पाहताना मनात एक प्रश्न हमखास डोकावतोया अफाट विश्वात पृथ्वीवरील मानवच एकमेव बुद्धिमान जीव आहे का? की कुठेतरी एखाद्या दूरच्या ग्रहावर आपल्यासारखी किंवा आपल्यापेक्षाही अधिक प्रगत संस्कृती अस्तित्वात आहे? पृथ्वीबाहेरील अशा संभाव्य सजीवांना 'एलियन' किंवा 'पृथ्वीबाह्य जीव' (एींीरींशीीशीीींळरश्र ङळषश) असे संबोधले जाते. हा प्रश्न केवळ विज्ञानकथा किंवा चित्रपटांपुरता मर्यादित नाही. जगभरातील खगोलशास्त्रज्ञ आणि वैज्ञानिक अनेक दशकांपासून याच प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी संशोधन करत आहेत.



वैज्ञानिकांच्या मते, विश्वात अब्जावधी आकाशगंगा आहेत. प्रत्येक आकाशगंगेत अब्जावधी तारे आणि त्यांच्याभोवती फिरणारे असंख्य ग्रह आहेत. एवढ्या प्रचंड विश्वात जीवन फक्त पृथ्वीवरच असावे, ही शक्यता अत्यंत कमी वाटते. म्हणूनच वैज्ञानिक विश्वात अन्यत्रही जीवन अस्तित्वात असण्याची शक्यता नाकारत नाहीत. गणितीय आणि सांख्यिकीय दृष्टिकोनातून पाहिले, तर विश्वात कुठेतरी जीवन असण्याची शक्यता मोठी आहे. मात्र, त्या जीवांपर्यंत पोहोचणे किंवा त्यांचा आपल्याशी संपर्क होणे हा पूर्णपणे वेगळा आणि अधिक कठीण प्रश्न आहे. वैज्ञानिकांचे मत आहे की, येत्या काही दशकांत प्रगत तंत्रज्ञानाच्या मदतीने आपल्या सौरमालेतील एखाद्या ग्रहावर किंवा उपग्रहावर सूक्ष्मजीव, जीवाणू किंवा प्राचीन जीवनाच्या खुणा सापडू शकतात. तो पृथ्वीबाह्य जीवनाच्या शोधातील महत्त्वाचा टप्पा ठरेल.

सध्याच्या काळात एलियन कधीतरी पृथ्वीवर येतील, अशी कल्पना अनेकदा मांडली जाते. मात्र, विज्ञान या प्रश्नाकडे तर्क आणि पुराव्यांच्या आधारे पाहते. जर एलियन अस्तित्वात असतील, तर ते पृथ्वीवर येण्यामागे काही संभाव्य कारणे असू शकतात. नव्या निवासस्थानाचा शोध : जसे मानव मंगळावर जीवनाच्या शक्यता तपासत आहे, तसेच एखादी प्रगत संस्कृती स्वतःसाठी राहण्यायोग्य ग्रह शोधत पृथ्वीपर्यंत पोहोचू शकते. नैसर्गिक संसाधनांची गरज : त्यांच्या ग्रहावरील पाणी, खनिजे, ऊर्जा किंवा इतर संसाधने कमी झाली असतील, तर पृथ्वी त्यांच्यासाठी आकर्षणाचे केंद्र ठरू शकते. संशोधन आणि जिज्ञासा : तेही मानवाप्रमाणेच जिज्ञासू असू शकतात. विश्वातील इतर बुद्धिमान जीवांविषयी माहिती मिळवण्यासाठी किंवा संपर्क साधण्यासाठी ते पृथ्वीवर येण्याचा प्रयत्न करू शकतात. अत्याधुनिक तंत्रज्ञान : जर एखादी संस्कृती मानवापेक्षा लाखो वर्षे अधिक विकसित असेल, तर तिच्याकडे अत्यंत वेगवान किंवा आज आपल्या कल्पनेपलीकडील अवकाश प्रवासाची साधने असू शकतात. त्यामुळे पृथ्वीपर्यंतचा प्रवास त्यांच्यासाठी तुलनेने सोपा असू शकतो.

मग एलियन पृथ्वीवर का दिसत नाहीत? या प्रश्नालाही विज्ञान काही ठोस कारणे मांडते. अफाट अंतर : विश्वातील अंतर अकल्पनीय आहे. आपल्या सर्वात जवळच्या ताऱ्यांपैकी असलेल्या प्रॉक्सिमा सेंटॉरीपर्यंत पोहोचण्यासाठीही सध्याच्या तंत्रज्ञानाने हजारो वर्षे लागतील. त्यामुळे कोणत्याही संस्कृतीसाठी इतका लांब प्रवास करणे अत्यंत कठीण ठरू शकते. वेळेचे अंतर : एखादी एलियन संस्कृती लाखो वर्षांपूर्वी अस्तित्वात होती आणि नष्ट झाली असण्याची शक्यता आहे. किंवा ती भविष्यात उदयाला येईल, जेव्हा मानव पृथ्वीवर नसेल. त्यामुळे दोन्ही संस्कृतींचा काळ एकाच वेळी जुळणे आवश्यक नाही. संवादातील अडथळे : त्यांची भाषा, विचार करण्याची पद्धत, संवादाचे माध्यम किंवा तंत्रज्ञान पूर्णपणे वेगळे असू शकते. त्यामुळे आपण पाठवलेले संदेश त्यांना समजत नसतील किंवा त्यांचे संकेत आपण ओळखू शकत नसू.

पृथ्वीबाह्य जीवनाचा शोध घेण्यासाठी जगभरात विविध वैज्ञानिक प्रकल्प राबविले जात आहेत. सेटी (डएढख) प्रकल्प: 'सर्च फॉर एक्स्ट्रा-टेरेस्ट्रियल इंटेलिजन्स' (डएढख) ही पृथ्वीबाह्य बुद्धिमान संस्कृतींचा शोध घेणारी जगातील सर्वात मोठी संशोधन संस्था आहे. प्रचंड रेडिओ दुर्बिणींच्या साहाय्याने अवकाशातून येणाऱ्या रेडिओ संकेतांचे सातत्याने निरीक्षण केले जाते. या संकेतांमध्ये एखाद्या बुद्धिमान संस्कृतीचा संदेश दडलेला आहे का, याचा शोध वैज्ञानिक घेत आहेत.

व्हॉयेजरचे 'गोल्डन रेकॉर्ड' : १९७७ मध्ये नासाने 'व्हॉयेजर-१' आणि 'व्हॉयेजर-२' ही अंतराळयाने अवकाशात पाठवली. त्यामध्ये तांब्याची 'गोल्डन डिस्क' ठेवण्यात आली आहे. या डिस्कमध्ये पृथ्वीवरील नैसर्गिक आवाज, विविध प्रकारचे संगीत, ५५ भाषांतील अभिवादन, तसेच पृथ्वीची माहिती आणि तिचा नकाशा समाविष्ट करण्यात आला आहे. भविष्यात ही डिस्क एखाद्या पृथ्वीबाह्य संस्कृतीच्या हाती लागल्यास त्यांना मानवजातीची ओळख व्हावी, हा त्यामागील उद्देश आहे.

यूएफओ आणि यूएपीचा अभ्यास: जगभरातील अनेकांनी आकाशात रहस्यमय उडत्या वस्तू पाहिल्याचा दावा केला आहे. अशा घटनांना पूर्वी 'यूएफओ' म्हटले जात असे. आता त्यांचा 'यूएपी' (णपळवशपींळषळशव पेरश्रीीं झहशपेशपर) या नावाने अधिकृत वैज्ञानिक अभ्यास केला जात आहे. या घटना पृथ्वीबाह्य यानांशी संबंधित आहेत की त्यामागे नैसर्गिक अथवा मानवनिर्मित कारणे आहेत, याचा शोध सुरू आहे.

बाह्यग्रहांचा वाढता शोध: आज नासाच्या अत्याधुनिक दुर्बिणी आपल्या सौरमालेबाहेरील 'एक्सोप्लॅनेट्स' अर्थात बाह्यग्रहांचा शोध घेत आहेत. आतापर्यंत हजारो बाह्यग्रह सापडले असून त्यांपैकी अनेक ग्रह 'गोल्डीलॉक्स झोन'मध्ये आहेत. या झोनमधील ग्रह त्यांच्या ताऱ्यापासून योग्य अंतरावर असल्यामुळे तेथे द्रवरूप पाणी आणि जीवनासाठी आवश्यक वातावरण असण्याची शक्यता अधिक मानली जाते.

पृथ्वीच्या सर्वात जवळच्या संभाव्य जीवनयोग्य ग्रहांपैकी मंगळ हा एक महत्त्वाचा ग्रह मानला जातो. भारताची 'मंगळयान' मोहीम आणि नासाचा 'परसिव्हिअरन्स रोव्हर' यांसारख्या मोहिमांनी मंगळावरील पाणी, सूक्ष्मजीवांचे जीवाश्म आणि प्राचीन जीवनाच्या खुणांचा शोध घेण्याचे महत्त्वपूर्ण काम केले आहे. जर मंगळावर किंवा अन्य कोणत्याही ग्रहावर सूक्ष्मजीवांचे अस्तित्व सिद्ध करणारा ठोस पुरावा सापडला, तर तो पृथ्वीबाह्य जीवनाच्या शोधातील मानवजातीचा पहिला ऐतिहासिक वैज्ञानिक शोध ठरेल.

आजवर एलियनचे अस्तित्व सिद्ध करणारा कोणताही निर्विवाद वैज्ञानिक पुरावा मिळालेला नाही. तरीही विश्वाच्या अफाट विस्तारामुळे पृथ्वीबाहेर जीवन असण्याची शक्यता वैज्ञानिक नाकारत नाहीत. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी आधुनिक दुर्बिणी, अंतराळ मोहिमा, रेडिओ संकेतांचे निरीक्षण आणि अत्याधुनिक संशोधन सातत्याने सुरू आहे. कदाचित भविष्यात एखाद्या दूरच्या ग्रहावर जीवनाची पहिली खूण सापडेल. आणि त्या दिवशी मानवजातीसमोर विश्वाविषयीची सर्वात मोठी गूढ उकल होईलआपण विश्वात खरोखरच एकटे नाही!

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि. सांगली
मो. ७०३८१२१०१२

# लोकसंख्या शिक्षण काळाची गरज!

आज ११ जुलै, आजचा दिवस जगभर जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. ११ जुलै १९८७ रोजी जगात पाच अब्जावे बालक जन्माला आले. तेंव्हापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. १९८७ ते २०२१ अवघ्या ३४ वर्षात जगाची लोकसंख्या दोन अब्जांनी वाढून ती सात अब्जांपर्यंत पोहचली. याचाच अर्थ याचाच अर्थ जगाची लोकसंख्या तुफान वेगाने वाढत चालली आहे. भारतात तर लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे. २०२३ साली भारताने चीनला मागे सारून सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला. २०२३ च्या एप्रिल महिन्यात युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंट या जागतिक लोकसंख्येचा अभ्यास करणाऱ्या राष्ट्र संघाच्या संस्थेने त्याची पुष्टी केली आहे.

युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने २०२३ साली जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारताची लोकसंख्या चीनपेक्षा जास्त असून भारताची लोकसंख्या चीनपेक्षा अधिक आहे. भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. आज भारताची लोकसंख्या १४५ कोटींच्या पुढे गेली असण्याची शक्यता आहे. यावर्षी सुरू असलेल्या जनगणनेची आकडेवारी समोर आल्यावर त्याची पुष्टी होईलच. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारत आणि चीन या दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये २.९ दशलक्ष इतका फरक आहे. या अहवालात चीनच्या लोकसंख्या वाढीचा वेग घटत असून भारताच्या लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक असल्याचे नमूद केले आहे. आज भारताची लोकसंख्या १४५ कोटींच्या पुढे गेली आहे.

देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपली लोकसंख्या ३० कोटी इतकी होती. याचाच अर्थ मागील ७९ वर्षात आपल्या देशातील लोकसंख्या ११५ कोटींनी वाढली आहे. आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढत चाललेल्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्र्य असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत. विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठी अडसर ठरत आहे.

लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. वाढती लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासन स्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही. वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या अट्टाहासापाई तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभाग ही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम जोर धरत नाही.

लोकसंख्या नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिढीमध्ये योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे. यासाठी नव्या पिढीला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे . अवघ्या ३४ वर्षात जगाची लोकसंख्या ५ अब्जांनी वाढली तर देशाची लोकसंख्या ७९ वर्षात ११५ कोटींनी वाढली. या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही. त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर होईल हे नव्या पिढीला समजावून सांगावे लागेल. देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर त्याचे दुष्परिणाम आपल्याला सहन करावे लागेल. आपण जागतिक महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालवाच लागेल हे नवीन पिढीला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम , निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती द्यायला हवी त्यासाठी त्यासाठी शाळा महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे.

लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे त्यामुळे केवळ तरुणांनाच नाही तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे. लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढ रोखायची असेल, देशाला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल आणि देशाला महासत्ता बनवायचे असेल तर लोकसंख्या शिक्षणाला पर्याय नाही.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# आषाढी वारीतील चरणसेवा उपक्रम उत्साहात संपन्न




**नांदेड (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष तथा सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी वारीनिमित्त आयोजित करण्यात आलेला 'चरणसेवा' उपक्रम बुधवार, दि. ८ जुलै २०२६ रोजी मारोती मंदिर, सावरगाव पीर (ता. मुखेड, जि. नांदेड) येथे उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीपणे संपन्न झाला.

नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथून आषाढी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या सद्गुरू श्री गुंडा महाराज संस्थान, देगलूर यांच्या दिंडीची परंपरा अनेक वर्षांपासून अखंड सुरू आहे. या दिंडीसोबत जिल्ह्यातील शेकडो वारकरी पायी वारी करून श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे जातात.

वारकऱ्यांच्या पायी प्रवासामुळे होणारा शारीरिक थकवा कमी करणे, त्यांच्या पायांची व स्नायूंची योग्य काळजी घेणे तसेच आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, या उद्देशाने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि मुखेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. तुषार राठोड यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मंत्रालय, मुंबईचे विशेष कार्य अधिकारी तथा कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक, डॉ. स्वानंद सोनार तसेच जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमाचे नियोजन करण्यात आले.

या उपक्रमात सुमारे '६० वैद्यकीय तज्ज्ञांच्या चमूने ४०० हून अधिक वारकऱ्यांना' चरणसेवा, आरोग्य तपासणी व आवश्यक औषधोपचार उपलब्ध करून दिले. तसेच फिजिओथेरपी, आयुष उपचार पद्धतीद्वारे सेवा आणि पंचकर्म उपचारही देण्यात आले. या सेवेमुळे पायी प्रवासामुळे आलेला शारीरिक थकवा दूर होऊन पुढील वारीसाठी नवचैतन्य आणि ऊर्जा मिळाल्याची भावना अनेक वारकऱ्यांनी व्यक्त केली.

सद्गुरू श्री गुंडा महाराज संस्थान, देगलूरचे दिंडी प्रमुख ह.भ.प. गुरुराज महाराज यांनी चरणसेवा उपक्रमाचे विशेष कौतुक करत, या सेवेमुळे वारकऱ्यांना मोठा दिलासा मिळाल्याचे सांगितले. दिंडीतील वारकऱ्यांनीही उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करून आयोजकांचे आभार मानले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सद्गुरू श्री गुंडा महाराज संस्थान देगलूर, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड, सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नांदेड, नांदेड फिजिओथेरपी कॉलेज, पांगरी, आरोग्य भारती (नांदेड जिल्हा) तसेच अनुलोम, नांदेड जिल्हा यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एन. एस. गंगासागरे, स्वास्थवृत्त विभाग प्रमुख डॉ. यशवंत पाटील, डॉ. भास्कर पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, तालुका आरोग्य अधिकारी (मुखेड) डॉ. अविनाश देशमुख यांनी विशेष सहकार्य केले.

मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेडचे वैद्यकीय अधिकारी डॉ. चंद्रकांत मुंडे, समाजसेवा अधीक्षक गजानन वानखेडे, समन्वयक संभाजी लोंढे, शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाचे डॉ. देवानंद पवार, डॉ. संदीप फंड, डॉ. विनोद बिजमवार, डॉ. शंकर इंदूरकर, प्राथमिक आरोग्य केंद्र सावरगावचे डॉ. धोंडीबा मुंडे व त्यांचे कर्मचारीवृंद तसेच नांदेड फिजिओथेरपी कॉलेज, पांगरीचे असोसिएट डायरेक्टर डॉ. विजय भारतीया, डॉ. रोहिणी सरोदे व त्यांच्या सहकाऱ्यांसह अनुलोम, नांदेडचे पांडुरंग बुद्धेवाड, राम मुलंगे आणि निलेश डांगे तसेच संगमेश्वर देवकते व मनोज कांबळे यांनी उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

वारकऱ्यांच्या आरोग्यसेवेला प्राधान्य देणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे प्रभावी उदाहरण ठरला असून, भविष्यातही अशा स्वरूपाचे उपक्रम अधिक व्यापक स्तरावर राबविण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला.

# निमा वुमेन्स फोरम नांदेडतर्फे डॉक्टर्स डे सेलिब्रेशन व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा उत्साहात संपन्न




**नांदेड (प्रतिनिधी)–** निमा वुमन्स फोरम नांदेडतर्फे निमा भवन गणेश नगर नांदेड येथे डॉक्टर्स डे सेलिब्रेशन व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा आयोजित केला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नांदेडच्या महापौर कविता मुळे ह्या होत्या तर विशेष अतिथी म्हणून डॉ. शुभांगी मनाठकर, डॉ. करुणा जमदाडे व अध्यक्ष निमा वुमन्स फोरम नांदेड ह्या होत्या.

या कार्यक्रमाची सुरुवात धन्वंतरी पूजनाने झाली. नंतर धन्वंतरी स्तवन डॉ. जया सगरोळे यांनी गायले. पाहुण्यांचे स्वागत डॉ. पौर्णिमा केसराळे, डॉ. जया सगरोळे, डॉ. स्वरूपा जाधव यांनी केले.

या कार्यक्रमात विविध स्पर्धा परीक्षा आयएमओ, एनएसओ, दहावी, बारावी यांसारख्या एक्झाममध्ये गोल्ड मेडल भेटलेल्या विद्यार्थ्यांचा महापौर कविता मुळे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ आणि सर्टिफिकेट देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर रुग्णांची सेवा करत असताना डॉक्टरांनी स्वतःच्या आरोग्याची देखील काळजी घ्यावी, रुग्णांसाठी डॉक्टर म्हणजे देवच अशी भावना समाजामध्ये आहे. त्यामुळे 'डॉक्टर डे'च्या निमित्ताने समाजातील डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला. यानिमित्ताने डॉक्टर्स डेच्या निमित्ताने नांदेडमधील निमा वूमेन्स फोरमतर्फे डॉ. ज्योती पुरी, डॉ. सीमा मदने, डॉ. जया सगरोळे, डॉ. गीता जोशी, डॉ. छाया धुपेकर, डॉ. तृषा मणियार, डॉ. तृप्ती दुदलवार, डॉ. साधना शिवनकर, डॉ. मनीषा ढोले, डॉ. अर्चना ढगे या डॉक्टरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये सिए टॉपर कुमारी संजना ममता संजय करवा हिचा सत्कार देखील सत्कार करण्यात आला. तसेच विराज सगरोळे, सर्वज्ञ धनंजय मसलगेकर, अर्णव मदने, पूजा पुरी, अनुष्का पवार, ईशान जाधव, सई धुप्पेकर, अमोघ दुदलवार, अंश मणियार यांचा समावेश होता.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. स्वरूपा जाधव यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. माया पवार यांनी केले. आभार डॉ. करुणा जमदाडे यांनी मानले. महिलांच्या संघटनामुळे निमा वूमेन्स फोरम तर्फे समाजातील सामाजिक कार्यात वृक्षारोपण, किशोरी मेळावा व मोफत रोग निदान शिबीर, महिला दिन विशेष यासारखे कार्यक्रम राबविले जातात. संध्या छाया वृद्धाश्रम मध्ये फ्री चेकअप व मेडिसिन वाटप करण्यात आले.

# 'यशवंत' मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने वन महोत्सव साजरा




**नांदेड (प्रतिनिधी)–**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या निर्देशानुसार यशवंत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'वन महोत्सव सप्ताह' अंतर्गत महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम दि. ७ जुलै रोजी उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी प्र-कुलगुरू तथा प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून वृक्ष संवर्धनाचा संकल्प करण्यात आला. या प्रसंगी वृक्षसंवर्धनाचे महत्त्व विशद करताना त्यांनी, पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. यावेळी डॉ. कविता सोनकांबळे, डॉ. पद्माराणी राव, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. साईनाथ बिंदगे, डॉ. शिवाजी सूर्यवंशी, डॉ. रत्नमाला म्हस्के तसेच डॉ. एस. एल. शिंदे, डॉ. सुरेश तेलंग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

डॉ. साईनाथ बिंदगे यांनी, वन महोत्सवाचे उद्दिष्ट स्पष्ट करताना वृक्षारोपणाबरोबरच वृक्षांचे संगोपन करणे, ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असल्याचे सांगितले व पर्यावरण संवर्धनासाठी युवकांनी सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले.

उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रसिद्धी समन्वयक डॉ. अजय गव्हाणे, प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक कालिदास बिरादार, गजानन पाटील, जगन्नाथ महामुने यांचे सहकार्य लाभले. तसेच राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणारा हा वन महोत्सव महाविद्यालय परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# 'वीरशैव लिंगायतांना स्वतंत्र धर्माची मान्यता मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील'

## पंतप्रधान नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांना शिष्टमंडळ भेटणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** वीरशैव लिंगायतमध्ये अनेक पोटजाती आहेत. परंतु या समाजाची वीरशैव लिंगायत म्हणून एक वेगळी ओळख आहे. या समाजाच्या धार्मिक परंपरा आणि रुढी यांचे धर्मग्रंथांमध्ये अनेक पुरावे आढळतात. देशामध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या सहा धर्मांशिवाय सातवा धर्म म्हणून वीरशैव लिंगायत धर्माला स्वतंत्र मान्यता मिळवून देण्याचा प्रयत्न करणार असल्याची माहिती केदारपिठाचे जगद्गुरू रावल विद्याविभूषित श्रीश्रीश्री १००८ भीमाशंकरलिंग महास्वामीजी यांनी दिली.



या संदर्भात आनंदनगर परिसरातील श्री केदारेश्वर सत्संग भवनात आयोजित केलेल्या एका व्यापक बैठकीत धर्मोपदेश करताना ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र व तेलंगणातील २५ पेक्षा अधिक मठाधिपतींसह भाजपाचे कंधार तालुकाध्यक्ष बालाजी पांडागळे, भाजपा प्रवक्ते संतोष पांडागळे यांची उपस्थिती होती.

श्री केदार जगद्गुरू पुढे म्हणाले की, देशामध्ये जातीनिहाय जणगनणा होऊ घातली आहे. ही जणगनणा पुढील वर्षीच्या फेब्रुवारी महिन्यात सुरू होणार आहे. सध्या अस्तित्वामध्ये हिंदू, बौद्ध, मुस्लीम, जैन, ख्रिश्चन, शीख या धर्मांना संविधानिक मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये धर्माचा सातवा रकाना सध्या रिक्त आहे. सातवा धर्म म्हणून वीरशैव धर्मास मान्यता देणे गरजेचे आहे. यासाठीचे सर्व पौराणिक, अध्यात्मिक व सांस्कृतिक पुरावे अनादीकाळापासून अस्तित्वात असलेल्या धर्मग्रंथांमध्ये उपलब्ध आहेत.

या सर्व बाबींचा विचार करण्यासाठी हा निर्णय घाईघाईत घेण्यापेक्षा या संदर्भात समाजातील कायदेतज्ज्ञ, धर्मगुरू व विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांची एक व्यापक बैठक २ ऑगस्ट रोजी उदगीर येथे घेण्यात येईल. या बैठकीत व्यापक समावेश असलेल्या मान्यवरांचे एक शिष्टमंडळ तयार करण्यात येईल व हे शिष्टमंडळ देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्याशी भेटून वीरशैव लिंगायत धर्मास मान्यता देण्यासाठी विनंती करेल, अशी माहिती यावेळी श्री केदार जगद्गुरू यांनी उपस्थितांना दिली.

यावेळी नांदेड जिल्ह्यातून आलेल्या वीरशैव लिंगायत समाजातील अनेकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार राज्याचे माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे यांनी मानले.

# नांदेड पोलिसांकडून ७० हजारांचा अवैध गुटखा जप्त, एकजण अटकेत

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या पथकाने प्रभावी कारवाई करत अवैध गुटखा विक्री व बाळगणाऱ्यांवर कारवाई केली आहे.

८ जुलै रोजी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार यांनी आपल्या हद्दीत पेट्रोलींग करीत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून न्यायनगर कॉर्नरवर एका चहा स्टॉलमध्ये शासनाने बंदी घातलेला गुटखा, सुगंधीत पान मसाला बेकायदेशीर विक्री करीत आहे असे समजले. यावरून नमूद पथकाने दुपारी दीड वाजता पंचासह न्यायनगर येथील शिवम टी हाऊस येथे छापा मारला असता सदर ठिकाणी आरोपी राजू पांडुरंग कंधारे (वय ३४ वर्षे रा. कंधारेवाडी, ता. कंधार जि.नांदेड ह.म. भगवानबाबा चौक, नांदेड) याने आपल्या हॉटेल समोर ठेवलेल्या ॲक्टीव्हा गाडी क्र. (MH26BN1245) चे डिक्कीमध्ये महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला व मानवी शरीरास अपायकारक असणारा प्रतिबंधित गुटखा, पान मसाला असा वाहनासह ७० हजार ८४२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करून त्याच्या विरूध्द नांदेड ग्रामीन ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# टीईटीसह विविध महत्त्वपूर्ण मागण्यांसंदर्भात शिक्षक संघटनांकडून मुख्यमंत्र्यास निवेदन



**नांदेड (प्रतिनिधी)–** शिक्षकांच्या विविध महत्वपूर्ण प्रलंबित मागण्यांसंदर्भात जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटनांकडून जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. जिल्हाधिकारी यांच्यावतीने उपजिल्हाधिकारी संतोषी देवकुळे यांनी निवेदन स्वीकारले. उपरोक्त मागण्यांसंदर्भात उपजिल्हाधिकारी यांचेशी सर्व शिक्षक संघटनांच्या वतीने युवराज पोवाडे यांनी सविस्तर भूमिका व्यक्त केली. मुख्यमंत्र्यास देण्यात आलेल्या निवेदनात पुढीलप्रमाणे मागण्या आहेत.

आरटीई ॲक्ट २००९ चा कायदा अंमलात येण्यापूर्वी नियुक्त झालेल्या कार्यरत शिक्षकांवर लादण्यात आलेली टीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट तत्काळ रद्द व्हावी म्हणून आपल्यास्तरावरून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, कार्यरत शिक्षकांची टी.ई.टी. परीक्षा घ्यावयाचीच असेल तर तमिळनाडू, केरळ, कर्नाटक व उत्तर प्रदेशमधील निर्णयाप्रमाणे निर्णय घ्यावा. दि. १४ मे २०२५ च्या मा. शिक्षण संचालक पुणे यांच्या पत्रानुसार १ सप्टेंबर २०२५ पर्यंत उत्तीर्ण असणाऱ्या टी.ई.टी. धारक शिक्षकांना दिलेल्या पदोन्नत्या रद्द करून, सेवाज्येष्ठ शिक्षकांवरील अन्याय दूर करावा. विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, पदवीधर व मुख्याध्यापक पदोन्नतीमधील अन्याय दूर करावेत. शिक्षकांना बीएलओ, एसआयआर व यांसारखी अशैक्षणिक कामे देणे बंद करावे. विद्यार्थी व शाळा विरोधी 'संचमान्यता धोरण' रद्द करण्यात यावे.

यावेळी युवराज पोवाडे, जी. एस. मंगनाळे, विठ्ठल चव्हाण, बाबुराव कैलासे, एल. बी. चव्हाण, संतोष अंबुलगेकर, तसलीम शेख, व्यंकट कल्याणपाड, एच. व्ही. चिवडे, सुधाकर गायकवाड, ज्ञानेश्वर कल्याणकर, शंकर हासगुळे, दिलीप देवकांबळे, निळकंठ चोंडे, अशोक पवळे, संग्राम झूडपे, डी. एस. धात्रक, माधव पचलिंग, जी. बी. मोरे, सुधाकर धडके, रवी बंडेवार, अशोक पाटील, नागनाथ गाभणे, माणिक कदम, दीपक लोहबंदे, विलास जाधव, नाथा केंद्रे, प्रमोद पाटील, संजय शेळगे, एम. ए. कदीर, रमेश घुमलवाड, बेग मोतीपाशा, बालाजी चंदावाड आदी उपस्थित होते.

# १ जुलै ते १५ ऑगस्ट दरम्यान 'माय भारत' नोंदणी अभियानाला प्रारंभ

**नांदेड (प्रतिनिधी)–** युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाच्या माय भारत उपक्रमांतर्गत भारतात १ जुलै ते १५ ऑगस्ट या कालावधीत विशेष नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा उद्देश जिल्ह्यातील अधिकाधिक युवक-युवतींना https://mybharat.gov.in/ माय भारत पोर्टलशी जोडून त्यांना स्वयंसेवा, कौशल्य विकास, अनुभवाधारित शिक्षण आणि विविध शासकीय उपक्रमामध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देणे हा आहे.

या अभियानादरम्यान महाविद्यालये, शाळा, युवक मंडळे, स्वयंसेवी संस्था तसेच विविध शासकीय कार्यालयाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर नोंदणी करण्यात येणार आहे. पात्र युवकांनी मोबाईल क्रमांक, ई-मेल व आवश्यक कागदपत्रांच्या साहाय्याने माय भारत पोर्टलवर विनामूल्ये नोंदणी करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी नांदेड अशनी कानकाटे यांनी केले आहे. खालील दिलेल्या लिंक किंवा क्यूआर कोडद्वारे युवकांना माय भारतशी जोडता येईल.

जिल्ह्यातील सर्व युवक-युवती, माय भारत, राष्ट्रीय सेवा योजना, एन. सी. सी, भारत स्काऊड गाईड, शैक्षणिक संस्था तसेच युवक संघटनांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून अधिकाधिक युवकांनी नोंदणली करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मेरा युवा भारत, नांदेड यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात अद्रिक सस्टेनेबल सोल्युशन्ससोबत सकारात्मक चर्चा

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात शाश्वत शेती, पर्यावरण संवर्धन आणि कृषी अवशेषांचे मूल्यवर्धन करण्याच्या दृष्टीने बायोचार प्रकल्प राबविण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत अद्रिक सस्टेनेबल सोल्युशन्स आणि जिल्हा प्रशासन यांच्यात प्रशासकीय स्तरावरील अनौपचारिक बैठक पार पडली.



बैठकीत अद्रिक सस्टेनेबल सोल्युशन्सचे अविनाश उमरे आणि अक्षय श्रीकंठवार यांनी बायोचार प्रकल्पाचे सादरीकरण केले. विशेषतः कापूस पिकाचे अवशेष आणि प्रोसोपिस जुलीफ्लोरा (विलायती बाभूळ) यांचा वापर करून बायोचार निर्मिती करण्याच्या तंत्रज्ञानाची माहिती देण्यात आली.

बायोचारमुळे कृषी अवशेष जाळण्याचे प्रमाण कमी होऊन वायू प्रदूषणात घट होईल. मातीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढेल, पाणी धारण क्षमता सुधारेल आणि जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होईल. तसेच कार्बन संचयनाला चालना मिळून हवामान बदलाच्या परिणामांना कमी करण्यासाठीही हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरू शकतो, असे बैठकीत नमूद करण्यात आले.

यावेळी प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक प्रशासकीय समन्वय, विविध शासकीय विभागांचा सहभाग, शेतकरी जनजागृती, प्रशिक्षण आणि प्रायोगिक स्वरूपात प्रकल्प सुरू करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. कृषी अवशेषांचे मूल्यवर्धन करून शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचे स्रोत उपलब्ध करून देण्यासोबतच ग्रामीण भागात हरित रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या दृष्टीनेही या प्रकल्पाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी पर्यावरणपूरक आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रशासना-कडून आवश्यक सहकार्य देण्याची सकारात्मक भूमिका व्यक्त केली. जिल्ह्यात बायोचार प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यासाठी संबंधित विभागांमध्ये समन्वय साधून पुढील कार्यवाही करण्याबाबतही बैठकीत सकारात्मक चर्चा झाली.

# स्वावलंबन, उद्योग आणि महिला सक्षमीकरणाचा प्रेरणादायी सोहळा; १४ व्या वार्षिक सभेत स्वावलंबी एकल महिला उद्योजिकांचा गौरव

**नांदेड (प्रतिनिधी)–** महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली सावित्री महिला लोकसंचलित साधन केंद्र, नांदेड यांची १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा - २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या उपस्थितीत संपन्न झाली. कार्यक्रमात जिल्ह्यातील विविध बचत गटांतील महिला, एकल महिला उद्योजिका, सीएमआरसी पदाधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात माविमचे विभागीय सल्लागार संदीप मराठे व वृक्षमित्र संतोष मुगटकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी सन २०२५-२६ या वर्षाचा कार्यअहवाल प्रकाशित करण्यात आला. कार्यअहवालातून वर्षभरात बचत गट सक्षमीकरण, महिला उद्योग विकास, बँक कर्ज सुविधा, प्रशिक्षण उपक्रम, एकल महिला सक्षमीकरण आणि विविध सामाजिक उपक्रमांचा आढावा मांडण्यात आला.

सभेचे प्रमुख आकर्षण ठरले ते स्वावलंबी एकल महिला उद्योजिकांचा गौरव सन्मान. बचत गटांच्या माध्यमातून शेतीपूरक उद्योग, पशुपालन, किरकोळ व्यवसाय, सेवा व्यवसाय तसेच विविध लघुउद्योग यशस्वीपणे उभारून स्वतः बरोबरच इतर महिलांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या महिलांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. सन्मानित महिलांनी आपल्या संघर्षमय प्रवासातून स्वावलंबनाचा आदर्श निर्माण केला असून, त्यांच्या कार्याचा गौरव उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात केला.

मार्गदर्शन करताना संदीप मराठे यांनी महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी उद्योग-व्यवसायात पुढाकार घ्यावा, असे सांगितले. कर्जातून खरेदी करण्यात येणारी मालमत्ता महिलांच्या नावावर किंवा संयुक्त मालकी हक्काने नोंदविण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. मालमत्तेवरील महिलांचा हक्क हा त्यांच्या आर्थिक सुरक्षिततेचा भक्कम आधार असून, प्रत्येक कुटुंबाने याबाबत सकारात्मक भूमिका घ्यावी, असे त्यांनी सांगितले. बचत गट हे केवळ बचतीचे माध्यम नसून महिलांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी व्यासपीठ असल्याचेही त्यांनी नमूद केले.

अनंत खेत्रे जिल्हा समन्वय अधिकाऱ्यांनी आपल्या मार्गदर्शनात एकल महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून संघटित होऊन शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, कौशल्यविकास प्रशिक्षणांचा उपयोग करून उद्योग उभारावेत आणि आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने ठामपणे वाटचाल करावी, असे आवाहन केले.

वृक्षमित्र संतोष मुगटकर यांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत प्रत्येक महिलेने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन केले. पर्यावरणाचे रक्षण आणि आर्थिक प्रगती या दोन्ही बाबी समाजाच्या शाश्वत विकासासाठी महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच महिलांच्या जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमामुळे कोणतेही ध्येय अशक्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# अंतर्मन

# घरच्या देवघरात एकाच देवाच्या दोन मूर्ती ठेवाव्यात का?

## जाणून घ्या पूजेशी संबंधित महत्त्वाचे नियम...

**घरातील देवघरात एकाच देवाच्या दोन मूर्ती किंवा दोन छायाचित्रे ठेवणे योग्य आहे का? हा प्रश्न अनेकांच्या मनात असतो. वास्तुशास्त्र आणि पारंपरिक श्रद्धेनुसार देवघरातील मूर्तींची मांडणी विशिष्ट नियमांनुसार असावी, असे मानले जाते. याबाबत वास्तुतज्ज्ञांनी सांगितलेल्या काही महत्त्वाच्या बाबी जाणून घेणे गरजेचे आहे...**

वास्तुशास्त्रातील काही मतांनुसार, देवघरात एकाच देवाच्या दोन मूर्ती अगदी जवळ ठेवणे टाळावे. असे केल्यास सकारात्मक ऊर्जेचा समतोल बिघडतो, अशी धारणा आहे. त्यामुळे घरातील वातावरणावर नकारात्मक परिणाम होऊन कुटुंबातील सदस्यांमध्ये मतभेद आणि वाद वाढू शकतात, असे मानले जाते. पारंपरिक श्रद्धेनुसार, एकाच देवाच्या दोन मूर्ती ठेवल्यास अनावश्यक खर्च वाढू शकतो आणि आर्थिक अडचणी निर्माण होऊ शकतात. तसेच यामुळे वास्तुदोष निर्माण होऊन त्याचा परिणाम घराच्या आर्थिक स्थितीवर होतो, अशीही मान्यता आहे.

### शांतता आणि आरोग्यावर परिणाम

अशा मांडणीमुळे कुटुंबातील सदस्यांमध्ये राग, अहंकार आणि तणाव वाढू शकतो, असे काही वास्तुतज्ज्ञांचे मत आहे. त्यामुळे घरातील आनंद आणि शांतता कमी होण्याबरोबरच सदस्यांना वारंवार किरकोळ आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. काहींच्या मते, कर्जबाजारीपणाही वाढण्याची शक्यता असते.

### नोकरी आणि व्यवसायावरही परिणाम

वास्तुशास्त्रानुसार, देवघरातील चुकीच्या मांडणीचा परिणाम नोकरी आणि व्यवसायावरही होऊ शकतो. व्यवसायातील कामे अडथळ्यात येणे, अपेक्षित प्रगती न होणे किंवा नोकरीत बढती मिळण्यास विलंब होणे, अशा अडचणी निर्माण होतात, अशी धारणा आहे.

### देवघरात मूर्ती ठेवताना हे नियम पाळा

देवघरात शक्यतो प्रत्येक देवी-देवतेची एकच मूर्ती किंवा एकच छायाचित्र ठेवावे. घरातील पूजेसाठी ठेवली जाणारी मूर्ती साधारण ३ ते ४ इंचांपेक्षा मोठी नसावी, असे मानले जाते. मूर्ती तुटल्यास किंवा खंडित झाल्यास तिची पूजा करू नये. अशा मूर्तीचे योग्य धार्मिक पद्धतीने विसर्जन करावे किंवा पवित्र ठिकाणी ठेवावे. देवघर नेहमी स्वच्छ, नीटनेटके आणि अनावश्यक मूर्ती किंवा वस्तूंनी भरलेले नसावे. यामुळे घरात सकारात्मक वातावरण टिकून राहते, अशी श्रद्धा आहे.

**टीप :** ही माहिती वास्तुशास्त्र आणि पारंपरिक धार्मिक श्रद्धांवर आधारित आहे. याला वैज्ञानिक आधार असल्याचा दावा केलेला नाही. श्रद्धा आणि वैयक्तिक विश्वासानुसार या नियमांचे पालन करावे.

# आमिर खान यांनी पत्नी गौरीला दिली दुर्मिळ माणिकाची अंगठी

## कोणत्या राशींसाठी माणिक शुभ मानले जाते?



- मेष, कर्क, सिंह, तुला, वृश्चिक आणि धनु राशीच्या व्यक्तींना माणिक धारण करणे लाभदायक मानले जाते.
- ज्या व्यक्तींच्या जन्म कुंडलीत सूर्य योग कारक असतो, त्यांनाही हे रत्न शुभ फल देऊ शकते, अशी श्रद्धा आहे.

## जाणून घ्या माणिक रत्न धारण करण्याचे फायदे अन् योग्य पद्धत...

**अभिनेता आमिर खानने त्याची पत्नी गौरी स्प्रॅटला माणिक (रुबी) जडवलेली एक खास अंगठी भेट दिली आहे. ही अंगठी मादागास्करमधून आणलेल्या दुर्मिळ माणिकाने तयार करण्यात आली आहे. माणिक हे केवळ आकर्षक रत्न नसून वैदिक ज्योतिषशास्त्रात त्याला विशेष महत्त्व आहे. ज्योतिषानुसार माणिक हे सूर्य ग्रहाचे रत्न मानले जाते. योग्य विधीने धारण केल्यास आत्मविश्वास, नेतृत्वगुण, मान- सन्मान आणि करिअरमध्ये प्रगती मिळण्यास मदत होते, अशी श्रद्धा आहे.**

### माणिक धारण करण्याचे फायदे

ज्योतिषशास्त्रानुसार माणिक धारण केल्याने सूर्य ग्रह बळकट होतो. त्यामुळे सरकारी क्षेत्रात प्रतिष्ठा, भाग्योदय, संततीसुख, तेज आणि व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल होतो, असे मानले जाते. ज्योतिषतज्ज्ञांच्या मते, माणिक धारण केल्याने हृदयाशी संबंधित काही त्रास, घबराट, रक्तविकार आणि शारीरिक अशक्तपणा यांसारख्या समस्यांमध्येही लाभ होऊ शकतो, अशी पारंपरिक मान्यता आहे.

### अस्सल माणिक कसे ओळखावे?



अस्सल माणिकाचा रंग गडद लाल, पारदर्शक आणि अत्यंत तेजस्वी असतो. हातावर ठेवल्यास ते किंचित उबदार वाटते. त्याचे वजन सामान्य दगडांपेक्षा थोडे अधिक जाणवते. काचेच्या भांड्यात ठेवल्यास त्यातून लालसर किरणे परावर्तित झाल्याचे दिसू शकते. गायीच्या दुधात ठेवल्यास दुधाला किंचित गुलाबी छटा आल्याचे पारंपरिक मानले जाते.

### माणिक धारण करण्याची योग्य पद्धत

माणिक रविवारी धारण करणे शुभ मानले जाते. रविवारी सूर्य होरामध्ये ते धारण करणे अधिक उत्तम समजले जाते. हे रत्न सोन्याच्या किंवा तांब्याच्या अंगठीत जडवून परिधान करावे. ही दोन्ही धातू सूर्याशी संबंधित मानल्या जातात. कृत्तिका, उत्तराफाल्गुनी किंवा उत्तराषाढा नक्षत्रात माणिक धारण केल्यास विशेष लाभ मिळतो, अशी श्रद्धा आहे. धारण करण्यापूर्वी ॐ ह्रां ह्रीं ह्रौं सः सूर्याय नमः या सूर्य बीजमंत्राने रत्नाचे पूजन करून अभिमंत्रित करावे. माणिक धारण केल्यानंतर गायत्री मंत्राच्या तीन माळा, हवन आणि सूर्यदेवाची विधीपूर्वक पूजा करण्याची परंपरा आहे. माणिकाची अंगठी उजव्या हाताच्या अनामिका बोटात घातल्यास अधिक शुभ मानले जाते.

**टीप : रत्न धारण करण्याचे फायदे हे ज्योतिषशास्त्रातील पारंपरिक श्रद्धा आणि मान्यतांवर आधारित आहेत. कोणतेही रत्न धारण करण्यापूर्वी पात्र ज्योतिषतज्ज्ञांचा सल्ला घेणे उचित ठरते.**

# आषाढात लाडू गोपालांची सेवा कशी करावी?

### शास्त्रानुसार नियम...

हिंदू धर्मात भगवान श्रीकृष्णांच्या बालरूपाची, म्हणजेच लाडू गोपालांची सेवा अत्यंत पुण्यकारक मानली जाते. शास्त्रानुसार श्रद्धा आणि भक्तिभावाने लाडू गोपालांची सेवा केल्यास भक्ताच्या मनोकामना पूर्ण होतात, तसेच घरात सुख, शांती आणि समृद्धी नांदते, अशी धार्मिक मान्यता आहे. प्रत्येक ऋतूनुसार लाडू गोपालांच्या सेवाविधीत काही बदल करण्याची परंपरा आहे. आषाढ महिन्यात पावसाळ्याची सुरुवात होत असल्याने या काळात त्यांच्या सेवेसाठी काही विशेष नियम सांगितले गेले आहेत.



### आषाढात सेवा करण्याचे नियम...

धार्मिक मान्यतानुसार आषाढ महिन्यात लाडू गोपालांना सकाळी नेहमीपेक्षा थोडे उशिरा उठवावे. पावसाळ्यातील वातावरण लक्षात घेऊन त्यांची सेवा करावी. स्नानासाठी कोमट पाण्याचा वापर करावा. जाड किंवा चमकदार वस्त्रांऐवजी हलकी, स्वच्छ सुती वस्त्रे परिधान करावीत. नैवेद्यामध्ये आंबा, लोणी-साखर (माखन-मिश्री) आणि इतर ऋतूनुसार थंड प्रकृतीचे फळे अर्पण करावीत. उकाडा आणि दमट वातावरणामुळे त्रास होऊ नये म्हणून लाडू गोपालांजवळ छोटा पंखा ठेवावा. तसेच त्यांच्यासाठी आरामदायी आसनाची व्यवस्था करावी. नैवेद्य नेहमी सात्त्विक, ताजा आणि स्वच्छ असावा. रोजच्या पूजाविधीप्रमाणे श्रृंगार, आरती आणि दिवसातील तीन



वेळचा नैवेद्य नियमित अर्पण करावा. शिळे किंवा दीर्घकाळ ठेवलेले अन्न कधीही अर्पण करू नये. कोणताही नैवेद्य अर्पण करताना त्यात तुळशीचे पान (तुळशीदल) अवश्य ठेवावे.

### सेवेचे धार्मिक महत्त्व

धार्मिक मान्यतानुसार आषाढ महिन्यात लाडू गोपालांना सकाळी नेहमीपेक्षा थोडे उशिरा उठवावे. पावसाळ्यातील वातावरण लक्षात घेऊन त्यांची सेवा करावी. स्नानासाठी कोमट पाण्याचा वापर करावा. जाड किंवा चमकदार वस्त्रांऐवजी हलकी, स्वच्छ सुती वस्त्रे परिधान करावीत. नैवेद्यामध्ये आंबा, लोणी-साखर (माखन-मिश्री) आणि इतर ऋतूनुसार थंड प्रकृतीचे फळे अर्पण करावीत. उकाडा आणि दमट वातावरणामुळे त्रास होऊ नये म्हणून लाडू गोपालांजवळ छोटा पंखा ठेवावा. तसेच त्यांच्यासाठी आरामदायी आसनाची व्यवस्था करावी. नैवेद्य नेहमी सात्त्विक, ताजा आणि स्वच्छ असावा. रोजच्या पूजाविधीप्रमाणे श्रृंगार, आरती आणि दिवसातील तीन वेळचा नैवेद्य नियमित अर्पण करावा. शिळे किंवा दीर्घकाळ ठेवलेले अन्न कधीही अर्पण करू नये. कोणताही नैवेद्य अर्पण करताना त्यात तुळशीचे पान (तुळशीदल) अवश्य ठेवावे.

शास्त्रानुसार लाडू गोपालांची नियमित सेवा केल्याने भक्ताचे मन भक्ती, श्रद्धा आणि सकारात्मक विचारांकडे वळते. त्यांच्या नित्य पूजेमुळे मनोकामना पूर्ण होतात, अशी श्रद्धा आहे. तसेच घरात सुख, शांती, समृद्धी आणि कुटुंबातील सदस्यांमध्ये प्रेम व सौहार्द टिकून राहते, अशीही धार्मिक मान्यता आहे.

टीप : ही माहिती धार्मिक श्रद्धा, पुराणपरंपरा आणि ज्योतिषीय मान्यतांवर आधारित आहे. याकडे वैयक्तिक श्रद्धेच्या दृष्टीने पाहावे.

# सूर्यास्तानंतर कोणत्या वस्तूंचे दान टाळावे?

## मोहरीचे तेल, काळे तीळ यांसारख्या वस्तूंचे दान कधी शुभ मानले जाते, जाणून घ्या...

**हिंदू धर्मात दानधर्माला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. शास्त्रांनुसार योग्य वेळी आणि योग्य भावनेने केलेले दान पुण्यदायी मानले जाते. दानामुळे मनःशांती मिळते, तसेच नकळत झालेल्या पापांचे क्षालन होते, अशी धार्मिक श्रद्धा आहे. मात्र, चुकीच्या वेळी किंवा अयोग्य वस्तूंचे दान केल्यास त्याचे प्रतिकूल परिणामही होऊ शकतात, असे धर्मग्रंथांमध्ये नमूद केले आहे. त्यामुळे सूर्यास्तानंतर कोणत्या वस्तूंचे दान टाळावे आणि कोणत्या वस्तूंचे दान शुभ मानले जाते, याबाबत जाणून घेऊया...**

- सूर्यास्तानंतर कोणत्या वस्तूंचे दान करू नये? : ज्योतिषशास्त्रानुसार दानासाठी सूर्योदयानंतरचा काळ सर्वाधिक शुभ मानला जातो. त्यामुळे शक्यतो सूर्यास्तानंतर कोणत्याही वस्तूचे दान टाळावे. विशेषतः काही वस्तूंचे दान संध्याकाळी किंवा रात्री करू नये, अशी धार्मिक मान्यता आहे. यात सोने किंवा सोन्याशी संबंधित वस्तू, पैसे किंवा आर्थिक मदत, धान्य व अन्नपदार्थ, विशेषतः तांदूळ, हळद, मीठ. धार्मिक मान्यतेनुसार या वस्तूंचे सूर्यास्तानंतर दान केल्यास घरातील सुख-समृद्धी कमी होऊ शकते. तसेच शुक्र, गुरु किंवा राहू यांसारख्या ग्रहांचे प्रतिकूल परिणाम जाणवू शकतात, अशी श्रद्धा आहे.
- रात्री कोणत्या वस्तूंचे दान शुभ मानले जाते? : ज्योतिषशास्त्रानुसार शनिग्रहाशी संबंधित काही वस्तूंचे दान संध्याकाळी किंवा रात्री करणे शुभ मानले जाते. त्यामध्ये काळे तीळ, मोहरीचे तेल, उडीद डाळ, लोखंडापासून बनलेल्या वस्तू अशा वस्तूंचे दान केल्याने शनिदेवाची कृपा प्राप्त होते आणि दानाचे शुभ फळ मिळते, अशी धार्मिक मान्यता आहे.
- संध्याकाळी पैसे उधार देणेही टाळावे... : धार्मिक श्रद्धेनुसार सूर्यास्तानंतर कोणाला पैसे उधार देणे किंवा दान करणेही योग्य मानले जात नाही. यामुळे शुक्र ग्रहाचा प्रतिकूल प्रभाव पडू शकतो, असे ज्योतिषशास्त्रात सांगितले



जाते.
- संध्याकाळी दान का टाळावे? : शास्त्रांनुसार संध्याकाळचा काळ हा देवी लक्ष्मीच्या आगमनाचा काळ मानला जातो. या वेळी माता लक्ष्मी घरात सुख, समृद्धी आणि ऐश्वर्य घेऊन येतात, अशी श्रद्धा आहे. त्यामुळे या वेळेत घरातील संपत्ती किंवा अन्नाचे दान न करता, दानधर्माची कार्ये सूर्योदयानंतर करावीत, असे सांगितले जाते.

# देवशयनी एकादशी 24 की 25 जुलैला?

## योग्य तारीख, महत्त्व आणि पूजाविधी जाणून घ्या...

देवशयनी एकादशी हा आषाढ महिन्यातील अत्यंत महत्त्वाचा व्रतदिन मानला जातो. यालाच आषाढी एकादशी, हरिशयनी एकादशी आणि पद्मा एकादशी असेही म्हटले जाते. या दिवसापासून चातुर्मासाची सुरुवात होते. धार्मिक मान्यतेनुसार, या दिवशी भगवान विष्णू चार महिन्यांसाठी योगनिद्रेत जातात. या काळात भगवान शिवांचे रुद्रस्वरूप सृष्टीचे पालन करीत असल्याचे मानले जाते. त्यामुळे चातुर्मासात विवाह, गृहप्रवेश यांसारखे शुभ व मांगलिक कार्य टाळले जाते.

धर्मशास्त्रानुसार, ज्या दिवशी सूर्योदयाच्या वेळी एकादशी तिथी असते, त्या दिवशी एकादशीचे व्रत करणे श्रेष्ठ मानले जाते. यंदा एकादशी तिथीची सुरुवात २४ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.१३ वाजता होईल आणि २५ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.३५ वाजता तिथी समाप्त होईल. त्यामुळे देवशयनी एकादशीचे व्रत शनिवार, २५ जुलै २०२६ रोजी पाळले जाणार आहे.

- **एकादशी तिथी प्रारंभ : २४ जुलै २०२६, सकाळी ९.१३ वा.**
- **एकादशी तिथी समाप्त : २५ जुलै २०२६, सकाळी ११.३५ वा.**
- **व्रत : २५ जुलै २०२६**
- **पारण (व्रत सोडण्याची वेळ) : २६ जुलै २०२६, सकाळी ९.३० नंतर**



### देवशयनी एकादशीचे धार्मिक महत्त्व

पद्मपुराणानुसार, देवशयनी एकादशीचे व्रत केल्याने पापांचा क्षय होतो आणि अनेक यज्ञ व तीर्थयात्रांइतके पुण्य प्राप्त होते. या दिवशी भगवान विष्णूची भक्तिभावाने पूजा केल्यास त्यांची विशेष कृपा लाभते, अशी श्रद्धा आहे.

### देवशयनीचे धार्मिक महत्त्व

- **या दिवशी पुढील धार्मिक आचरण करणे शुभ मानले जाते:**
- **भगवान विष्णूंची विधिपूर्वक पूजा करणे.**
- **विष्णुमंत्रांचा जप करणे.**
- **विष्णू सहस्रनाम पठण करणे.**
- **सात्त्विक आहार घेऊन जप, तप व भक्तीमध्ये वेळ व्यतीत करणे.**

### चातुर्मासाची सुरुवात

देवशयनी एकादशीपासून चातुर्मास सुरू होतो. हा चार महिन्यांचा कालावधी आध्यात्मिक साधना, जप-तप, व्रत, दानधर्म आणि सात्त्विक जीवनशैलीसाठी अत्यंत पवित्र मानला जातो. या काळात धार्मिक आचरणाला विशेष महत्त्व दिले जाते, तर विवाहासह इतर शुभ समारंभ साधारणपणे टाळले जातात.

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७७१९०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## पाकिस्तानी लेबल असलेली बनावट सौंदर्यप्रसाधने जप्त, दुकानदार अटकेत

### ◆ बनावट ब्युटी क्रीमचा धंदा उघड; मुंबईहून आणलेला ३९ लाखांचा माल जप्त





**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील मन्यार गल्ली येथे 'मेड इन पाकिस्तान' असे लेबल असलेली बनावट सौंदर्यप्रसाधने विक्रीस ठेवल्याप्रकरणी इतवारा पोलिसांनी छापा टाकून ३९ लाख ६९ हजार ९४० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दुकान मालकाविरुद्ध पोलीस उपनिरीक्षक जळबा गायकवाड यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. शुक्रवार, दिनांक १० जुलै रोजी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण आगलावे यांनी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला एक दिवसाच्या पोलीस कोठडीत पाठवले आहे.

इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत 'मेड इन पाकिस्तान' ही महाराष्ट्र राज्यात बंदी असलेली सौंदर्य प्रसाधने विक्री होत असल्याची गुप्त माहिती पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांना मिळाली. त्यांनी सदरची माहिती ही उपविभागीय पोलीस अधिकारी (इतवारा) प्रशांत शिंदे आणि इतवारा ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ यांना सांगितली. यावरून एफडीएचे राठोड यांना सोबत घेऊन इतवारा पोलिसांनी कारवाई केली. मन्यार गल्लीतील अफरा कलेक्शन या दुकानात 'मेड इन पाकिस्तान' असे नमूद असलेली विविध सौंदर्यप्रसाधने विक्रीस आहेत. खातरजमा करण्यासाठी डमी ग्राहक पाठवून खरेदी केल्यानंतर पंचांसमक्ष छापा टाकण्यात आला. छाप्यात दुकानदार मोहम्मद जियाउद्दीन मोहम्मद वाजीद (वय २५ वर्षे, रा. मन्यार गल्ली, ह.मु. हैदरबाग देगलूर नाका, नांदेड) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून खालील बनावट ब्रँडचे मोठे साठे आढळले:UJOOB Beauty Cream, USM Beauty Cream, Ultra Glam Beauty Cream, Maniya Beauty Cream, Face Gold Beauty Cream, Double White VC Beauty Cream यांसह इतर विविध सौंदर्यप्रसाधने असा एकूण ३९ लाख ६९ हजार ९४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

चौकशीत आरोपीने हा माल मुंबईतील क्रॉफर्ड मार्केटमधून आणल्याचे सांगितले. तसेच नांदेडमधील अनेक दुकानदार हे देखील मुंबईहून असा माल घेतात, अशी त्याने पोलिसांना माहिती दिली. त्याच्या माहितीवरून नांदेड शहरातील अनेक दुकानदार पोलिसांच्या रडारवर असून, काहींची चौकशीही सुरू केल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गु.र.नं. २४२/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम १२३, ३१८(४) सह औषधी व सौंदर्यप्रसाधन अधिनियम कलम १८(सी), २७(२)(ब) आणि विदेश व्यापार अधिनियम कलम ३(३), ११(२) नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. जप्त केलेला माल तपासणीसाठी तज्ज्ञांकडे पाठविण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन व उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक खन्नाळ, पोउपनि प्रवीण आगलावे, जळबा गायकवाड, सपोउपनि बेग, हवालदार कदम, कोरनुळे, जगताप, शेख यांनी केली. सौंदर्यप्रसाधने खरेदी करताना त्यावरील लेबल, उत्पादकाची माहिती, परवाना व दर्जा यांची खातरजमा करावी. संशयास्पद किंवा बनावट वस्तू विक्री होत असल्याचे आढळल्यास त्वरित जवळच्या पोलीस ठाण्यास माहिती द्यावी, असे आवाहन नांदेड जिल्हा पोलिसांनी केले आहे.

## असर्जन येथे अवैध वाळू उपसा करणाऱ्या ५ आरोपींविरुद्ध गुन्हा; ४५ लाखांचा ऐवज जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध वाळू उपसा व वाहतुकीवर आळा घालण्यासाठी सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत नांदेड ग्रामीण पोलीस आणि महसूल पथकाने संयुक्त कारवाई करत ४५ लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी ५ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरुवार, दि. ९ जुलै रोजी नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांचे सहकारी अंमलदार हद्दीत पेट्रोलिंग करत असताना मिळालेल्या माहितीनुसार असर्जन येथील गोदावरी नदीपात्रात अवैधरित्या वाळूचा उपसा सुरू होता. माहितीच्या आधारे नांदेड ग्रामीण पोलीस व महसूल पथकाने पंचांसमक्ष संयुक्त छापा टाकला.

छाप्यात २ बोटी, ३ इंजिन, १० तराफे आणि प्रत्येक बोटी व तराफ्यावरील एकूण १२ ब्रास वाळू असा ४५ लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून तो जागीच कापून, तोडून व जाळून नदीपात्रात नष्ट करण्यात आला.

या प्रकरणी आरोपी संतोष ऊर्फ लालू गाडे, बजरंग कुटे, कैलास कुटे, तिघे रा. असर्जन, ता. नांदेड आणि २ अनोळखी अशा ५ जणांविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. ८५०/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) सह महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम ४८(७), ४८(८) व पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९, १५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक सूरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पो.उपनि. बाबुराव चव्हाण, हवालदार कारामुंगे, जॅकुट, हनवता कदम, जमीर, सिरमलवार आणि महसूल पथकातील नायब तहसीलदार सुनील माचेवाड, मंडळ अधिकारी बेलमटे व त्यांच्या पथकाने केली.

**पोलिसांचा इशारा**

जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन, वाहतूक, अवैध दारू, जुगार, गुटखा यांसारखे व्यवसाय करणाऱ्यांविरुद्ध भविष्यातही अशाच कठोर कारवाया सुरू राहतील, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

## डॉ. विश्वास देशमुख यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी) –** शहरातील तरोडेकर भाजी मार्केट हनुमानपेठ नांदेड येथे राहणारे ज्येष्ठ नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. विश्वास नारायणराव देशमुख यांचे शुक्रवार, दि. १० जुलै रोजी सकाळी अल्पशा आजाराने हैदराबादमधील एका खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. ते ७० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुली, जावई, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. ते मूळचे शिरडशहापूर जि. हिंगोलीचे रहिवासी असून, गत अनेक दशकांपासून त्यांनी नांदेडमध्ये नेत्ररोग तज्ज्ञ म्हणून कर्तव्य बजावले. त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. ११ जुलै रोजी सकाळी १० वाजता शांतीधाम स्मशानभूमी गोवर्धनघाट नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## जुगार अड्ड्यावर धाड; ११ आरोपींसह ५ लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत गुरुवार, दि. ९ जुलै २०२६ रोजी कुंटूर पोलीस ठाणे हद्दीतील राहेर शेतशिवार येथे जुगार अड्ड्यावर यशस्वी धाड टाकण्यात आली.

उपविभागीय पोलीस अधिकारी बिलोली यांना गोपनीय माहितीच्या आधारे त्यांचे पोलीस पथकाने पंचांसमक्ष राहेर शेतशिवार येथे सुरू असलेल्या 'तिर्रट' जुगारावर छापा टाकला. यावेळी घटनास्थळावर जुगार खेळणाऱ्या ११ आरोपींना ताब्यात घेण्यात आले. कारवाई दरम्यान आरोपींकडून व घटनास्थळावरून रोख रक्कम ५४ हजार ४५०, १० अँड्रॉइड मोबाईल फोन अंदाजे ८७ हजार, ६ मोटारसायकली – अंदाजे ३ लाख ६० हजार, तिर्रट जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य (छाप पत्ते इ.) असा ५ लाख २ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी संबंधित ११ आरोपींविरुद्ध कुंटूर ठाण्यात गुन्हा कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास कुंटूर पोलीस करीत आहेत.

ही कारवाई डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी (बिलोली) शाम पानेगावकर, पोलीस उपनिरीक्षक तिडके, अंमलदार अंबोरे, कांबळे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## तोतया पोलिसांनी ज्येष्ठ नागरिकाला लुटले

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराला लागूनच असलेल्या कौठा भागातील नागार्जुना शाळेसमोर तीन तोतया पोलिसांनी एका ज्येष्ठ नागरिकाच्या हातातील सोन्याच्या दोन अंगठ्या काढून घेऊन पोबारा केल्याची घटना बुधवारी सकाळी घडली आहे.

नंदकिशोर काशिराम पाटील (वय ५८), रा. गोपाळनगर, नागपूर ह.मु. गोकुळधाम सोसायटीच्या मागे नवीन कौठा, नांदेड हे बुधवारी सकाळी फिरण्यासाठी गेले असताना नागार्जुना शाळेसमोर तीन अनोळखी इसमांनी त्यांना गाठले. पाटील यांना आम्ही पोलीस असल्याची बतावणी करुन त्यांच्या हाताच्या बोटातील दीड लाख रुपये किंमतीच्या दोन सोन्याच्या अंगठ्या काढून घेतल्या. त्यांना दोन बनावट सोन्याच्या अंगठ्या कागदात पुडी बांधून दिल्या. त्यानंतर हे तिघेही तोतया पोलीस पळून गेले. कागदातील सोन्याच्या अंगठ्या बनावट असल्याचे लक्षात आल्यानंतर नंदकिशोर पाटील यांनी नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली.

या प्रकरणी तीन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून, या गुन्ह्याचा पुढील तपास सपोनी गायकवाड करत आहेत. यापूर्वीही सदरील मार्गावर तोतया पोलिसांनी काही जणांना लुटल्याच्या घटना घडल्या आहेत.

## नांदासौख्यभरे

### गंभीरे – शिंदे

नांदेड शहरातील गणेशनगर येथील रहिवासी तथा भाजपचे जिल्हा सरचिटणीस विजय गंभीरे पाटील यांचे सुपुत्र चि. विराज आणि नायगाव बा. येथील रहिवासी माधवराव शिंदे पाटील यांची सुकन्या चि. सौ. कां. पूजा यांचा शुभविवाह शनिवार,११जुलै २०२६ राजी १२.०९ वा. गुंडेगावकर मंगल कार्यालय, एमआयडीसी, सिडको नांदेड येथे संपन्न होत आहे.

### जैन – चोरडिया

सुरेंद्र जैन यांची सुकन्या चि. सौ. कां. सायुरी आणि प्रशांत चोरडिया यांचे सुपुत्र चि. आकाश यांच्या शुभविवाहानिमित्त अक्षता, स्वागत समारोह तथा सुरूची भोजन कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, दि. ११ जुलै २०२६ रोजी दुपारी १२ ते ३ या वेळात आशीर्वाद गार्डन काबरानगर रिंगरोड येथे संपन्न होत आहे.

वधु-वरास हार्दिक शुभेच्छा.

–मुख्यसंपादक

## मासरेडमध्ये सव्वाचार लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त -एसपी डॉ. निलाभ रोहन



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व अवैध जुगार खेळणाऱ्या इसमांवर मासरेडचे आयोजन करून एकूण ४ लाख २६ हजार १५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याचे पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी सांगितले.

नांदेड जिल्ह्यातील अवैध व्यवसाय बंद करण्यासंबंधाने जिल्ह्यातील अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व अवैध जुगार खेळणाऱ्या इसमांविरूध्द कारवाई करण्यासाठी डॉ. निलाभ रोहन यांनी दिनांक ८ जुलै २०२६ रोजी मासरेडचे आयोजन केले होते. सदर मासरेड कामी डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्यासह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड येथील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार तसेच सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी भाग घेतला होता.

सदर मासरेड दरम्यान अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व अवैध जुगार खेळणारे लोकांचे ठिकाणावर छापा टाकून समूळ उच्चाटन करण्यासाठी राबविलेल्या मोहिमेमध्ये नांदेड जिल्ह्यात एकूण ६८ गुन्हे दाखल करून एकूण ६८ आरोपीतांवर कारवाई करत ४ लाख २६ हजार १५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## मीना सोनाळकर यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी) –** मुखेड तालुक्यातील ग्राम निवळी येथील विठ्ठल मंदिर परिसरातील रहिवासी तथा नांदेड तालुक्यातीलप्राथमिक आरोग्य केंद्र रहाटी अंतर्गत उपकेंद्र वाघी येथील कार्यरत आरोग्य सेविका मीना गणपत सोनाळकर (पिटलेवाड) (वय ४०) यांचे शुक्रवार, दि. १० रोजी अल्पशा आजाराने निधन झाले

त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार, दि. १० जुलै रोजी दुपारी १ वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, सासरे असा परिवार आहे. गणपत महाराज सोनाळकर यांच्या त्या पत्नी होत.

## मनपा शाळांच्या विकासाबरोबर महिला कल्याण योजनांनाही प्राधान्य देणार -सदिच्छा सोनी



**नांदेड (प्रतिनिधी)–** महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण तसेच शिक्षण समितीची महत्त्वपूर्ण आढावा बैठक समितीच्या सभापती सदिच्छा सोनी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत महानगरपालिका शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा, आरोग्यविषयक उपक्रम तसेच महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीस उपसभापती निरंजना लांडगे यांच्यासह अमृताबाई ठाकूर, राजश्री गोडबोले, सुलोचना काकडे, मनप्रीतकौर कुंजीवाले, नीलम यादव, अलकेसरी सुमय्या आणि संध्या देमगुंडे उपस्थित होत्या. सदस्यांनी महानगरपालिका शाळांमधील पायाभूत सुविधांची स्थिती, इमारतींची दुरुस्ती, स्वच्छता, विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य आणि दर्जेदार शिक्षणासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत सूचना मांडल्या. विविध शैक्षणिक प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यावर विशेष भर देण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देत आगामी काळात महानगरपालिका शाळांमध्ये व्यापक आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. विशेषतः शाळकरी मुलींना गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळावे, यासाठी एचपीव्ही (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) प्रतिबंधक लसीकरण प्रभावीपणे राबविण्याच्या नियोजनाचाही सविस्तर आढावा घेण्यात आला. या उपक्रमामुळे भविष्यात गंभीर आजाराचा धोका कमी होण्यास मदत होणार असल्याने त्याला विशेष महत्त्व देण्यात आले.

## तुळसाबाई खंदारे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी) –** येथून जवळच असलेल्या वाडी बु. येथील ज्येष्ठ महिला रहिवासी श्रीमती तुळसाबाई भिवाजी खंदारे यांचे शुक्रवार, दि. १० जुलै रोजी दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय १०२ वर्षे होते. त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. ११ जुलै रोजी सकाळी ११ वाजता नवी वाडी पूर्णा रोड नांदेड येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात ४ मुले, ४ मुली, नातू, पणतू असा परिवार आहे.

## पासदगावची दिंडी पुण्यातून आज पंढरपूरकडे मार्गस्थ



**नांदेड (प्रतिनिधी) –** तीर्थक्षेत्र वारकरी आश्रम पासदगाव देवस्थान येथील संत ज्ञानेश्वर महाराज पायी दिंडी पालखी सोहळ्याचा मुक्काम पुणे येथील मार्केट यार्ड येथे गेल्या दोन दिवसांपासून होता. या ठिकाणी प्रसिद्ध व्यापारी विघ्नहर्ता ट्रेडिंग कंपनीचे योगेश दुर्गे, बापूशेठ वाडकर, श्याम शेठ शेंडगे, लहू शेठ भगत यांच्यावतीने दिंडीतील वारकरी भावीक-भक्तांना अन्नदानासह सर्व सुविधा पुरविण्यात आल्याने भक्तांची कोणतीच गैरसोय झाली नसल्याचे सांगून दिंडी प्रमुख हभप दिगंबर अशोक महाराज किरकन आळंदीकर यांनी त्यांचे मनोभावे आभार व्यक्त केले.

हभप दिगंबर अशोक महाराज किरकन यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ३ जुलै रोजी शेकडो वारकरी भक्तांच्या उपस्थितीत विठ्ठल नामाच्या गजरात पायी दिंडी आळंदीकडे रवाना झाली होती. आळंदी व पुणे परिसरात अतिवृष्टी झाल्याने सर्व वारकरी भक्तांना आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर परिसरात येण्यासाठी प्रशासनाने बंदी घातली होती. त्यामुळे दिंडीतील सर्वच वारकऱ्यांना श्री संत ज्ञानेश्वर म हाराजांचे दर्शन घेता आले नाही. मात्र पायी दिंडीत श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीतील पादुकांचे दर्शन घेण्याचे योग सर्वांना आल्याने सर्व वारकरी धन्य झाले आहेत.

पायी दिंडी पालखी सोहळ्यात नांदेडसह पासदगाव व परिसरातील शेकडो विठ्ठल भक्त सहभागी झाले आहेत. पुणे येथील दोन दिवशी दिंडीच्या मुक्कामानंतर शनिवार, दि. ११ जुलै रोजी दिंडी सकाळी पंढरपूर साठी मार्गस्थ होणार आहे.

## प्रसाद बन वाङ्मय पुरस्कारांचे रविवारी वितरण

### कुबेर, अरबुने, राही आणि पाटोदेकर हे मानकरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी मराठी भाषेतील उत्कृष्ट पुस्तकांना प्रसाद बन वाङ्मय पुरस्कार देण्यात येतात. एका ज्येष्ठ साहित्यिकाला मातोश्री पद्मिनीबाई बन साधना सन्मानाने गौरविण्यात येते. यंदा दै. लोकसत्ताचे संपादक आणि लेखक गिरीश कुबेर यांना मातोश्री पद्मिनीबाई बन साधना सन्मानाने सन्मानित करण्यात येणार आहे. बुलडाणा जिल्ह्यातील कवी अजीम नवाज राही यांना प्रसाद बन वाङ्मय पुरस्कार देण्यात येणार आहे. प्रसाद बन ग्रंथगौरव पुरस्कारासाठी वसई येथील संगीता अरबुने आणि डॉ. प्र. दि. जोशी पाटोदेकर यांच्या पुस्तकांची निवड करण्यात आली आहे.

रविवार, दि. १२ जुलै रोजी सकाळी दहा वाजता नांदेड येथे हा पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न होणार आहे. पुरस्कार योजनेचे हे रौप्यमहोत्सवी वर्ष असल्यामुळे या निमित्ताने सिद्ध केलेल्या 'प्रसादपर्व' ह्या ग्रंथाचे आणि डॉ. अच्युत बन यांच्या 'ज्वालामुखींच्या प्रदेशात' ह्या प्रवासवर्णनपर पुस्तकाचे प्रकाशन यावेळी होणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नियोजन भवनात आयोजित या सोहळ्यात साहित्यिक आणि साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. अच्युत बन, पुरस्कार समितीचे निमंत्रक डॉ. सुरेश सावंत आणि संयोजक पत्रकार संजीव कुळकर्णी यांनी केले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com